भारत ज्ञान विज्ञान समुदाय

आमची प्रकाशने

क्र. पुस्तकाचे नाव	किंमत
१ अक्कामाई	३
२ सरड्याचे स्वप्न	४
३ गडबड घोटाळा	४
४ रूमालातील ससा	४
५ सोनेरी अनुभव	४
६ सगळी धडपड शिकण्यासाठी	५
७ कुपोषणावर मात	५
८ षित पाणी उपाय काय?	५
९ सर्दी, ताप यापासून सुटका	५
१० चमत्कारी सकाळ	५
११ मंगलू यमराजाच्या दरबारात	५
१२ ख्वाजा नसरूद्दिन भारतात	५
१३ मावशीचा सल्ला	५
१४ देणारं झाड	५
१५ मांजराची वरात	५
१६ तीन मुलींची आई	५
१७ आकाश दर्शन	५
१८ गोष्ट फर्डिनांडची	६
१९ लहान्या आर्थरचा सूर्य	६
२० सादाको आणि हजार बगळे	६
२१ कोंबडीची पिल्लं	६
२२ मिश्काची खीर	६
२३ छकडा टांगा मोटार	६
२४ पोपट	६
२५ केरकचरा	६
२६ फुग्याचा तो दिवस	६
२७ आरोग्य स्त्रियांचा हक्क	६

क्र. पुस्तकाचे नाव	किंमत
२८ मूल कसे जन्मते	६
२९ कीडनाशकांचा सुरक्षित वापर	८
३० कोरड्या विहीरी भरतील कशा?	८
३१ गाणी मुक्तीची	८
३२ आपली आशा	५
३३ छत्रपती शाहूंच्या आठवणी	१२
३४ एका वेगळ्या लग्नाची गोष्ट	३
३५ बोबक बकरा	८
३६ जॉनी एपिलसीडची गोष्ट	८
३७ पेटंट	१०

आगामी प्रकाशने

१) बिनीचे प्राणी
२) मुलगा काय? मुलगी काय?
३) मुलं आणि पाणी
४) जमीनीचा आहार
५) मुलं आणि तराजू
६) मुलं आणि पर्यावरण
७) विज्ञानाचे प्रयोग
८) वाचनातील गंमत
९) संयुक्त राष्ट्र संघाची वचने
१०) पृथ्वीचे रहस्य
१२) किडनाशाकांना पर्याय
१३) माझो जमीन
१४) अन्न सुरक्षा

लवकरच पुर्नमुद्रित करीत आहोत

• श्यामची आई • वैज्ञानिक शोधाच्या गमती • धोंडिराम माणसात आला • कालयंत्र • सामना बुद्धीचा • खेळ बुद्धीबळाचा • धूमकेतू • शिवराजची गलोल • घरटं • विज्ञानाचे खेळ • आजीचा न्याय • तेजली • कथा गमतीच्या • पक्ष्यांची अजब दुनिया • पैज • आकाशातील लंपडाव • शेतकऱ्यांचा शास्त्रज्ञ कार्व्हर • सूर्य तुझाच आहे

सर्वांना शिक्षण

स्वप्न नव्हे, हक्क!

भारत ज्ञान विज्ञान समुदाय
महाराष्ट्र

संपादक
विनया देशपांडे

संपादन सहाय्य
परेश ज.म.

चित्रे व रेखांकन
प्रोब अहवाल व अन्य प्रकाशनांवरून साभार

अक्षर जुळणी
वैशाली गुप्ता

जवाआं/म-६५
प्रकाशनः दोन ऑक्टोबर २००५

देणगी मूल्यः२५ रु.

गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण सर्व मुला-मुलींना मिळावे यासाठी भारत ज्ञान विज्ञान समुदाय, महाराष्ट्र करत असलेल्या अभियानासाठी प्रकाशित केलेली पुस्तिका

प्रकाशकः विनया देशपांडे
राज्य सचीव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
२९१, बापटवाडी, शनिवार पेठ, पुणे- ४११०३०
फोन - ०२०-४४३४१३३
मुद्रण स्थळः नर्मदा ऑफसेट, पुणे- ४११०३०

सर्वांना शिक्षण

स्वप्न नव्हे, हक्क!

भारत ज्ञान विज्ञान समुदाय
महाराष्ट्र

अनुक्रमणिका

१.प्रस्तावना १

२.आपल्या मुलांनी काय, कसे आणि का शिकावे? ४
डॉ. विनोद रैना

३.सर्वांना शिक्षण?...काही सवाल! १४
दत्ता देसाई

४.शिक्षणाची गुणवत्ताः केरळमधील प्रयोग
एकः शिक्षणाचा नवा कार्यक्रम २८
दोनः अभ्यासक्रम आणि शिकण्या-शिकवण्याची साधने ३४
डॉ. अनिता रामपाल

५.मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार विधेयक २००५ ४१
संकलनः किशोर दरक/विनया देशपांडे

६.धोरणात्मक सारांश ५०
अनुवादः डॉ. उदय नारकर

७. आदरणीय गुरूजी ५८
(मुलाचे शिक्षकास पत्र)



प्रस्तावना

२१ व्या शतकातील वाटचाल समाजाचा खऱ्या विकासाकडे व्हायला हवी आणि त्यासाठी एक महत्त्वाचा घटक आहे गुणवत्तापूर्ण शिक्षण. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून गेली १००-१५० वर्षे आपल्या देशात शिक्षणासाठी चळवळ व संघर्ष सुरू आहे. गरीब-कष्टकरी, श्रमजीवी वर्गातील प्रत्येक मुला-मुलीमध्ये शिकण्यासाठीच्या आकांक्षा, स्वप्ने आहेत. त्यासाठी त्यांची अविरत धडपड सुरू आहे. अर्धवेळ काम करून, प्रसंगी उपाशी राहून शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक मुलमुलीला दिलासा देणारे एक आशादायी चित्र समोर येत आहे.संसदेच्या येत्या हिवाळी अधिवेशनात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक चर्चेला येणार आहे. याचे कायद्यात रुपांतर झाले तर अशा कोट्यवधी मुला-मुलींना त्यांचे हिरावलेले बालपण परत मिळण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडू शकेल.

आज पेटंट कायद्यातील दुरुस्ती, बियाणे कायदा, पर्यावरण धोरण, वीज व पाणी विषयक धोरणे आणि कायदे, शिक्षण व आरोग्य विषयक धोरणे ही सारी जनविरोधी व बाजारपेठी स्वरूपाची धोरणे म्हणून पुढे येत आहेत. अशावेळी, राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क देणारा कायदा हे दोन्ही अर्थी महत्वाचे आहेत- एकतर बहुसंख्य लोकांपासून सारे काही हिरावून घेतले जात असतांना त्यांना रोजगार, शिक्षण यापैकी काहीतरी लाभ हातात मिळण्याने त्यांचा आशावाद टिकू शकतो, नव्या जीवनासाठी त्यांचा लढण्याचा आत्मविश्वास जागवू शकतो.

या कायद्यासोबतच नव्याने गठीत केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (एनसीईआरटीने) जीवनाशी/परिसराशी निगडीत असा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ तयार केला आहे. प्रा. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली तयार केलेल्या या मसुद्यात गुणवत्तापूर्ण

शिक्षणासाठी त्याची घोकंपट्टी पद्धतीपासून फारकत होईल आणि तो समृद्ध करण्यासाठी पाठ्यपुस्तकांच्या मर्यादेपलीकडे जाईल याची काळजी घेण्यात आली आहे. आत्ताच्या अध्यापन व परीक्षा पध्दतीमुळे श्रम करणारे वंचित घटक यांच्या ज्ञानाची/अनुभवाची दखल घेतली जात नाही. त्या जागी नव्या आराखड्यामध्ये मूल्यमापन हे वर्गातील नित्य जीवनाचा एक भाग बनवणे अभिप्रेत आहे. देशाची लोकशाही चौकट बळकट करणारे, सामाजिक न्याय सांस्कृतिक वैविध्यता जोपासणाऱ्या शिक्षणाची संकल्पना यात मांडण्यात आली आहे. शांततेचे शिक्षण या नव्या विषयाच्या परिणामी सामाजिक पर्यावरणाचा विचार केल्याचे दिसते.

मोफत शिक्षणाचा कायदा व हा अभ्यासक्रम याचा एकत्रित परिणामातून गुणवत्तापूर्ण सार्वत्रिक शिक्षण प्रत्यक्षात येवू शकेल.त्यासाठी येत्या वर्षात १७,००० कोटी रुपयांची तरतूद (तपस मुजुमदार समिती) करावी लागेल असा अंदाज वर्तवला जात आहे. केंद्रातील सध्याच्या संयुक्त लोकशाही आघाडी सरकारने देखील आपल्या किमान समान कार्यक्रमात ढोबळ राष्ट्रीयं उत्पन्नाच्यां ६% खर्च शिक्षणावर करण्याचे आश्वासन त्यांच्या जाहिरनाम्यात दिले आहे. मात्र आजही यासाठी पुरेशी तरतूद होत नाही. जागतिकीकरण-खाजगीकरणाच्या नादी लागलेल्या शासनाला या निमित्ताने पुन्हा एकदा त्याच्या जबाबदारीचे भान देवून समाजकल्याणकारी विकासासाठी किमान पावले टाकायला लावण्यासाठी एक साधन म्हणून या कायद्याकडे बघावे लागेल.

या कायद्यात काही विसंगती व त्रुटी आहेत. त्रुटी काढून हा कायदा अधिक परिपूर्ण करण्यासाठीही आपण प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे.आणि त्याचवेळी हे ही लक्षात घेतले पाहिजे या विसंगतीचा वापर करुन 'बाजारवादी' शक्ती स्वतःचे घोडे पुढे दामटण्याचा नक्कीच प्रयत्न करतील. आपल्या देशातील लहान लेकरांच्या शिक्षणाचे स्वप्न या शक्ती ('बाजारवादी' घोड्यांच्या टापांखाली) बिनदिक्कतपणे चिरडू पाहतील.

अशावेळी, कोट्यवधी मुलेमुलींच्या भवितव्यासाठी आपण झगडणार, एका संपन्न लोकशाही प्रक्रियेसाठी प्रयत्न करणार की शिक्षणातील ठोकशाही चालू ठेवण्याचा मार्ग स्विकारणार? प्राथमिक शिक्षणाच्या हक्काचा कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा याबाबत आपला स्वतःचा दृष्टिकोन काय ठेवणार? नकारात्मक की सकारात्मक? जैसे थे वादी की परिवर्तनशील? तक्रारखोर की हाती आलेल्या संधीनिशी झुंजणारा? मूग गिळून गप्प राहाणारा की गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी देशभर सर्वदूरलोकांशी संवाद साधणारा? याचा विचार करण्यासाठी या पुस्तिकेचा उपयोग होईल असे वाटते. आराखड्याचा धोरणात्मक सारांश, सोप्या सुटसुटीत भाषेतील विधेयकातील तरतूदी, या सोबतच शिक्षणाविषयी मूलभूत विचार करायला लावणारे श्री. विनोद रैना व श्री. दत्ता देसाई यांचे लेख तसेच केरळचे काही अनुभव येथे दिले आहेत. या साऱ्याचा आपल्याला उपयोग होईल असे वाटते.

❑❑❑

आपल्या मुलांनी काय, कसे आणि का शिकावे?

डॉ. विनोद रैना

लेखाच्या शीर्षकातले काय आणि कसे हे प्रश्न मुलांच्या शिक्षणाबाबतीत संयुक्तिक, संदर्भपूर्ण वाटतील पण मुलांनी का शिकावे हा प्रश्न जरा अर्थहीन किंवा मुर्खपणाचाही वाटेल कारण त्याचे उत्तर अगदीच उघड आहे. पण तो मुळीच अर्थहीन नाही. उलट आपली घटना तयार होत असताना घडलेल्या चर्चांपैकी एका अत्यंत महत्वाच्या चर्चेशी/वादाशी त्याचा जवळचा संबंध आहे.

का?

चर्चा शासनाबद्दल होती. प्रौढ मताधिकाराचा भारतीय राज्यघटनेत समावेश करायचा की नाही? विरोधी बाजूच्या म्हणण्यानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार देणे म्हणजे बहुसंख्य अशिक्षितांना अधिकार देणे आहे. अधिकाराचा दुरुपयोग करून ते लोकशाही शासनाचा विपर्यास करतील वादाच्या बाजूने बोलणाऱ्यांचे म्हणणे काय असेल त्याची आपण सहज कल्पना करू शकतो. शेवटी कलम ४५, हे मार्गदर्शक तत्व घटनेत सामाविष्ट करून तोडगा काढण्यात आला, त्यानुसार १४ वर्षाखालील सर्व मुलांना राज्य घटनेच्या स्वीकृतीनंतर दहा वर्षांच्या आत, याचा अर्थ १९६० पर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य ठरवण्यात आले. दहा वर्षांची ही मुदत आगळ्या महत्वाची आहे. कारण घटनेत एकाच मार्गदर्शक तत्वाला कालमर्यादा घातलेली आहे. आपल्या नेत्यांना सार्वत्रिक शिक्षणाच्या भक्कम पायावर उभारलेली लोकशाही शासनप्रणाली आणण्यात दहा वर्षांपेक्षा अधिक काळ खर्चायचा नव्हता म्हणजे कलम ४५ च्या समावेशामागे केवळ शिक्षणाची काळजी नव्हती तर स्वस्थ लोकशाही आणि गुणवत्तापूर्ण शासनाची चिंता होती. त्यामुळे मुलांनी का शिकावे या प्रश्नाला भारतीय घटनेअंतर्गत फार मोठा अर्थ आहे.

१९६० संपून ४४ वर्षं झाली आणि वास्तववादी आकडे असे सुचवतात की ६-१४ वयोगटातली जवळपास निम्मी म्हणजे तब्बल १०

कोटी मुले अजूनही शाळे बाहेर आहेत.त्यांची कधीही नोंदणी झालीच नसेल, किंवा खोटी पटनोंदणी झाली असेल अथवा त्यांनी शाळा सोडली असेल. मोठ्या प्रमाणावर झालेले अभ्यास आणि सर्वेक्षणानुसार, जी १० कोटी मुले शाळेत आहेत, त्यांच्यापैकी साधारणतः १/४ मुलांनी काही मूलभूत शिक्षण मिळवले आहे असे म्हणता येईल, उरलेली त्यांना मिळणाऱ्या दर्जाहीन शिक्षणाचा परिणाम म्हणून निरक्षरतेच्या विविध टप्प्यांवर रेंगाळत आहेत. राज्य सरकारांना मूलभूत शिक्षणाची सर्वांची सोय करण्यात आलेल्या अपयशाच्या पलीकडे जाऊन ही परिस्थिती शासनप्रणाली बद्दलच काही बोचणारे प्रश्न निर्माण करते. १९६० पासून बरीच मतदानाचा अधिकार बजावणारी लोकसंख्या निरक्षर राहिली आहे, त्यामुळे घटना तज्ज्ञानी आम्हाला सांगावे की अशा निरक्षरांनी निवडलेले लोकप्रतिनिधी आणि त्यांनी स्थापन केलेली १९६० पासूनची सरकारे वैध होती का? की घटनेच्या तत्वांच्या आणि कायद्यांच्या विरोधी होती?

शिक्षणाच्या संदर्भात एकामागून एक स्थापन होणाऱ्या सरकारांना त्यांची घटनात्मक कर्तव्ये बजावायला लावण्यास कलम ४५ कमी पडले. वाढत्या लोकदडपणामुळे संसदेने ८६ वी घटना दुरुस्ती करून शिक्षणाचा मूलभूत हक्कात समावेश केला. या मूलभूत हक्काला काही कायद्यांची चौकट देण्यासाठी सध्या शिक्षणाच्या विधेयकाची चर्चा सुरु आहे. पण प्रश्न असा आहे की ४५ व्या कलमांपेक्षा ८६ वी घटनादुरुस्ती सरकारवर अधिक दडपण किंवा बंधन टाकू शकेल काय? खरे पाहता ८६ वी घटना दुरुस्ती ही कलम ४५ ला पातळ करणारी आहे असे म्हणता येईल. कारण यात ०-६ वयोगटातल्या मुलांना शिक्षणातून वगळले आहे आणि, पालकांवरच

मुलांच्या शिक्षणाची सक्ती ही दुरुस्ती करते. सरकार त्याकडे किती गंभीरपणे बघते याची परीक्षा अंदाजपत्रकाकडे पाहून घेता येईल. शिक्षणावर किमान ६%खर्च करण्यापेक्षा (१९६८ सालीच ही शिफारस करण्यात आली होती.) सरकार वेगवेगळ्या संस्थांवर आणि जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम(DPEP), सर्व शिक्षा अभियानासारख्या योजनांवर, शिक्षण करा सारख्या करांवर पैसा गोळा करण्यासाठी अवलबूंन राहात आहे. तरीदेखील हे सगळे मिळूनसुद्धा राष्ट्रीय ढोबळ उत्पादनाच्या ६% पेक्षा कमी आहेत. यातून एक मोठा प्रश्न निर्माण होतो; राज्य आणि केंद्र शासनाला त्यांची घटनात्मक जबाबदारी कशी पार पाडायला लावायची? घटनाकर्त्यांनी लोकशाही निवडणूक प्रक्रियेसाठी लोकांच्या शिक्षणाची पूर्वअट घातलेली असतांना? या प्रश्नांना वैधानिक उत्तर देण्याचा एक प्रयत्न करता येईल तो म्हणजे मोफत आणि सक्तीच्या शिक्षणासंबंधी मांडण्यात येणाऱ्या विधेयकामधे शासनाला पळवाटा सापडू नयेत, आणि प्रयत्न, करावे, जास्तीत जास्त प्रयत्न केले जातील, त्याच्या मर्यादेमधे अशा शब्दांच्या वाक्यांच्या आड लपण्याची जागा सापडू नये अशी त्या विधेयकाची रचना केली जावी. आधीच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने तयार केलेला मसुदा सरळ बाजूला ठेवून नवीन सुरुवात करायला पाहिजे. म्हणजे

शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण

ढोबळ राष्ट्रीय उत्पादनापैकी शिक्षणावर खर्च केली जाणारी रक्कम



विधेयकामध्ये पुढील बाबींचा स्पष्ट उल्लेख होईल :

(अ) सर्वसामान्य अशी शिक्षणाची किमान गुणवत्ता- ती मूलभूत सोयीसुविधा आणि प्रशिक्षित मनुष्यबळाच्या/संसाधनांच्या (शिक्षक वगैरे) स्वरुपात ठळक दिसावी.

(ब) स्वीकारार्ह आशय आणि प्रक्रिया.

(क) समाजाच्या सहभागाचे स्वरुप.

(ड) सरकारवर आवश्यक निधी उभारण्याची सक्ती.

सध्या सरकारच्या आवडत्या बनलेल्या, पर्यायी किंवा कंत्राटी शिक्षक तसेच 'पर्यायी', 'तात्पुरत्या' व 'हमी' योजनेखालील शाळा, अशा मार्गांचा पूर्णतः त्याग येणाऱ्या विधेयकाने केला पाहिजे असा या मुद्दयांचा अर्थ होतो. मुलांच्या शिक्षणाने सामाजिक एकात्मतेच्या प्रक्रियेचा भाग बनावा यासाठी हे विधेयक सामूहिक शाळांच्या तत्वावर आधारलेले असावे. १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात याचा प्रामुख्याने पुरस्कार केला आहे. जातीधर्माच्या, वर्गाच्या आधारावर चिरल्या जाणाऱ्या आपल्या समाजामध्ये या उणिवांवर मात करुन मुलांना एकत्र आणले पाहिजे. नाहीतर भयंकर परिणाम होतील.

का शिकवायचे मुलांना? या प्रश्नातल्या 'का' ला काही तात्विक उत्तरेसुद्धा आहेत. त्यांच्यायोगे आपल्याला शिक्षणाचा आशय व प्रक्रिया यांच्या गुणवत्तेबद्दल अधिक चांगल्या पद्धतीने बघता/बोलता येईल, शिक्षण का? यावर रवींद्रनाथ टागोरांचे विचार आजही उपयुक्त, संदर्भपूर्ण आणि मागोवा घेण्यासारखे आहेत. सृजनशीलतेचे वरदान प्रत्येकाला जन्मतःच मिळालेले असते. त्याला मूर्त स्वरुपात आणण्याचे काम शिक्षणाचे असते असे ते म्हणत. ग्राम्शीने हे तत्व थोड्या वेगळ्या प्रकारे सांगितले. प्रत्येक व्यक्ती तत्वज्ञ असते आणि त्यांचे समाजात मिसळणे एकाप्रकारचा व्यावहारिक शहाणपणा त्यांना मिळवून देत असतो. शास्त्रज्ञाचे शास्त्र, कलाकाराची कला दृष्टी (good sense) घडवत असते. शिक्षण या दृष्टीची सांगड व्यावहारिक शहाणपणाशी घालत असते. त्यातून एक जैव बुद्धिमान व्यक्ती घडत असते जी समाजामधे बदल घडवून आणते.

आपल्या शाळांमधून यापैकी काय तत्वज्ञान वापरले गेले? याचा

शोध घेण्यासाठी शिकवावे-शिकावे काय आणि कसे याकडे आपल्याला वळायला पाहिजे.

काय?

मुलांच्या शिक्षणाचा आशय ठरवण्यासाठी कोणती तत्वे आधारभूत ठरवायची? आज तर आपण मुलांना विज्ञान, गणित, भाषा,सामाजिक शास्त्र असे विषय शिकवत आहोत. यामधून ती दृष्टी घडते. टागोरांच्या म्हणण्यानुसार सृजनशीलतेची बीज अथवा ग्राम्शीचा व्यावहारिक शहाणपणा भाषेमध्ये अध्याह्त असतो. मूल शाळेत येण्याआधी घरी आणि बाहेर मिळणाऱ्या शारीरिक, सामाजिक संस्कृतीमधून, घरातल्या व्यवसायामधल्या/उद्योगांसाठी लागणाऱ्या ज्ञान-कौशल्या मार्फत शिकतच असते. दलित, आदिवासी, शेतकरी आणि कारागीरांची मुले हा विविध प्रकारचा शहाणपणा, ही समजूत याचे गाठोडे शाळेत येतांना घेऊनच आलेली असतात. पण शाळेला त्याचा काही उपयोग करता येत नाही. शाळेतले मान्यताप्राप्त गाठोडे म्हणजे मुलांच्या पाठीवरचे दप्तर, ज्याचे शारीरिक आणि मानसिक असे दुहेरी ओझे बनते. कारण या गाठोड्याचा त्या/तिच्याजवळच्या समजुतींच्या गाठोड्याशी काही संबंध नसतो. सर्वात वाईट म्हणजे, तिला तिचे सांस्कृतिक, भाषिक आणि आर्थिक स्थान तिच्या मागासलेपणाचे कारण असून तिने ते लवकरात लवकर फेकून नागरी जगात दाखल व्हावे, इतरांच्या स्पर्धेत सामाविष्ट व्हायचे आहे अशी वारंवार आठवण केली जाते.

भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, वांशिक, आहार, भौगौलिक आणि इतर अनेक बाबतींमध्ये वैविध्य असून देखील भारत एकसंघ देश आहे इतकेच नव्हे तर लोकशाही शासनप्रणाली वापरणारा देश कसा आहे याचे सर्वांना आश्चर्य वाटते, खरचं, कौतुक करण्यासारखे आहे हे. परंतु त्या देशातल्या शिक्षणाच्या आशयाद्वारे देश एकसंघ ठेवण्याची जबाबदारी या छोट्या खांद्यांवर ठेवल्यासारखी वाटते. साहजिकच आहे, सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमीमध्ये विविधता असणारी ही भारतीय मुलं वेगवेगळ्या सृजनक्षमता आणि व्यावहारिक शहाणपणा बाळगून आहेत. परंतु कुठेतरी, कधीतरी भारतीय राष्ट्राला वाटले की अशा वैविध्यांचा समावेश आधार म्हणून शिक्षणात केला तर राष्ट्रीय ऐक्याला बाधा

पोहोचेल. त्यामुळे इतिहास शिक्षणाची चौकट नेहमी 'राष्ट्रीय' राहिली, प्रादेशिक किंवा स्थानिक नाही. प्रत्येक बाब जणू राष्ट्रीय भारतीय मुलाला उद्देशून सांगितलेली. पण हा मुलगा किंवा मुलगी नेमके आहे तरी कोण? आगामी राष्ट्रीय पाठ्यक्रम आराखड्याने या प्रश्नाला थेट भिडले पाहिजे. गेली कित्येक वर्षे हा प्रश्न नुसता कानाआड टाकण्यात आला आहे. राष्ट्रीयत्वाच्या या कृत्रिम कल्पनांनी वैविध्याला मान देणाऱ्या शिक्षणपद्धतींना दूर सारले. इतकेच नाही.तर गेल्या ५-६ वर्षात दिसल्या तशा अनेक राष्ट्रीय गोष्टीच्या संकुचित व्याख्या तयार केल्या. इतिहास व इतर विषयांचे 'राष्ट्रीय'नावाखाली पुरुषप्रधान, मूलतत्ववादी दृष्टीकोनातून लिखाण केले. देशभक्तीचे शाळेच्या प्रागंणात साकारलेले हे रुप सुरुवातीपासूनच दोषी आहे, त्याला दुरुस्त करण्याची वेळ आता झाली आहे.

टागोरांच्या शिक्षणाच्या व्याख्येचे विडंबन करणारी व्याख्या सरकारने अनेक वर्षांपूर्वी जारी केली तिच्याशी काय शिकवावे या प्रश्नाचा संबंध जुळतो. त्या व्याख्येने शिक्षणाचा मोठा हेतू विकासासाठी मनुष्य संसाधने/बळ तयार करण्यापुरता मर्यादित करून ठेवला. म्हणजे श्रमाच्या बाजारात उभे करण्याइतपत लायकीची माणसे निर्माण करणे. शिक्षण मंत्रालयाचे बदललेले नाव- 'मानव संसाधन विकास मंत्रालय' आपल्याला सतत या व्याख्येतील बदलाचे भान आणून देते. तरीदेखील, अगदी या कामापुरत्या संकुचित चौकटीतून पाहिले तरी कसे शिकवावे या प्रश्नाचा तर्कशुद्ध विचार करता येतो का? उत्तर नकारार्थी आहे. आपल्या देशात अंदाजे ३५ कोटी लोक श्रमिक आहेत. जर शिक्षणाचा हेतू मनुष्यबळाचा विकास मानला तरी शालेय शिक्षणाच्या आशयामध्ये सुयोग्य ज्ञान आणि कौशल्ये अंतर्भूत केली आहेत?

श्रमजीवी वर्गाकडे बारकाईने पाहिलं तर कळेल की संघटित क्षेत्रात

फक्त २.७ कोटी लोक आहेत. उरलेले म्हणजे जवळजवळ ३२ कोटी लोक शेतकरी, कारागीर, विणकर, कलाकार, लोहार, सुतार, छोटे दुकानदार, चहा आणि खानावळी चालवणारे, गॅरेजमधे गाड्या दुरुस्त करणारे, संगीतकार, अभिनेते आणि चित्रकार, रंगारी असे आहेत. संघटित उद्योग आणि सेवाक्षेत्रां इतकाच अर्थव्यवस्थेतला वाटा त्यांचाही आहे. काय शिकवावे- हा शालेय शिक्षणाचा आशय फक्त संघटित उद्योग क्षेत्रातल्या छोट्या गटाची फारतर गरज भागवतो, असे म्हणता येईल. असंघटित क्षेत्रात लागणाऱ्या कौशल्य व ज्ञानाशी त्याची अजिबात सांगड बसत नाही. मग असंघटित क्षेत्रातल्या कष्टकऱ्यांच्या मुलांना शाळा अर्थहीन, बोजड वाटली तर त्यात नवल ते काय? त्यांच्या जीवनातल्या, समाजातल्या कौशल्यांचे काही एक प्रतिबिंब शालेय व्यवस्थेमधे उमटत नाही. काही काळानंतर त्यांनी जर शाळा सोडली, तर त्यांना दोष कसा देता येईल?

दृष्टी आणि व्यावहारिक शहाणपणाची सांगड आशयामध्ये करण्याच्या तत्वापासून आपण फार लांब गेलो आहोत. त्या नादात टागोरांच्या सृजनशील क्षमतांना पायदळी तुडवून बसलो आहोत. आता ह्या बाजूंचा समावेश करायचा म्हटले तर नुसत्या आशयाचा विचार उपयोगाचा नाही, पद्धतींचा विचारही करावा लागेल. शेवटी शिकण्याशिकवण्याची पद्धत तर मुलांच्या मनात अपरिचिताची परिचिताशी सांगड घालून जाणिवा समृद्ध करत असते.

कसे शिकवावे?

गांधी आणि टागोरांनी शिक्षणाचे वेगळे हेतू मांडले आणि आपापसातील मतभेदांची चर्चा अतिशय दर्जेदार व प्रेरणादायी प्रकाराने घडवून आणली. मतभेदांच्या पल्याड, भारतीय शिक्षण व्यवस्थेची शिक्षण देण्याची ब्राम्हणी पद्धत चुकीची आहे, यावर त्यांची एकवाक्यता होती. डोकं आणि हात या दोन्हींचा वापर शिकण्यासाठी केला पाहिजे असे मानणाऱ्या गांधीजींना आणि निसर्गाला शिक्षणाचा स्रोत मानणाऱ्या टागोरांना सर्वज्ञानी गुरु आणि त्यांच्या ज्ञान कौशल्याविषयी अजिबात शंका न घेता, कुठलाही प्रश्न न विचारता, वाद न घालता, गुरुही चूकू शकतो असे न मानता आकंठ

ज्ञान प्राशन करणारे त्यांचे शिष्य ही कल्पना मुळीच मान्य नव्हती. परंतु उपहास असा की हीच ब्राम्हणी ज्ञानपद्धती भारतीय लोकांच्या शिक्षणावर वर्चस्व गाजवत राहिली आहे. हल्ली त्या गुरुची जागा घेणारे दोन घटक उत्पन्न झाले आहेत. सर्वाधिकारी शालेय शिक्षक आणि नेहमीच बरोबर असणारे पाठ्यपुस्तक, खास करुन ते जर एनसीईआरटीने बनवले असेल तर. याउपर, मुलांच्या अल्पजीवी स्मृतीची परीक्षा घेणाऱ्या शालेय परीक्षेला फार तर गाईड आणि शिकवणीची गरज पडते.

आता 'व्यावहारिक शहाणपणाला' वर्गात आणायचे म्हटले तर लोकांमधून ज्ञानाची निर्मिती व्हायला हवी. नुसत्या पाठ्यपुस्तकात ते कसे येईल? याचाच अर्थ कधी कधी विद्यार्थ्याला जे माहित असेल ते शिक्षकाला माहित नसेल किंवा विद्यार्थ्यांच्या शंकांना शिक्षकांजवळ उत्तरे नसतील. उघडच आहे की अशा पद्धतीमधे सर्व मुलांसाठी एकच पाठ्यपुस्तक किंवा सर्वज्ञानी शिक्षक असू शकणार नाही. वर्गात हातांचा वापर करायचा तर काही कृतीआधारित उपक्रम हवेत. एकदंरीत, मुले वर्गात कशी बसतात, वर्गातली जागा (अवकाश) कशी वापरायची, निसर्गाकडून शिकण्यासाठी वर्गाबाहेर पडणे, प्रश्न-शंका विचारणे, वाद घालणे, पुस्तकात उत्तरे नसतील अशा प्रश्नांची बाहेर उत्तरे शोधणे असा याचा अर्थ होतो. शेवटी या सर्वांचे मिळून असे वातावरण तयार झाले पाहिजे जिथे मुले निर्भय असतील, हसू शकतील आणि त्यांना शाळा इतकी आवडेल की ती मागे रेंगाळत राहतील, दुसऱ्या दिवशी परत यायला उत्सुक असतील.

म्हणजेच कसे शिकवायचे? या प्रश्नामध्ये सध्याची हुकूमशाही

सर्वाधिकारी ब्राम्हणी पद्धत जाऊन त्याजागी अधिक लोकशाही प्रकारची पद्धत आली पाहिजे, ही मागणी अभिप्रेत आहे. 'मूल्य' शिकवण्यापेक्षा केवळ शिकवण्याची पद्धत बदलली तर सहकार्य आणि मतभिन्नतेचा सहनशील आदर ही मूल्ये रुजवता येतील. त्यायोगे धर्मनिरपेक्ष लोकशाही वातावरण निर्माण होईल, असे करता येईल का?

या कल्पना नव्या नाहीत. प्रश्न आहे की गेल्या ४४ वर्षे वयाच्या घटनात्मक तरतुदीनंतर अखेर आज तरी या कल्पना प्रत्यक्षात उतरवता येतील का? सर्व मुलांना योग्य शाळा उपयुक्त आणि आवडीचे शिक्षण मिळेल का? (ही दोन्ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रतिक असतील) आधी चर्चिलेला कायदेशीर मार्ग म्हणजे निव्वळ एक उपाय झाला. प्रत्यक्ष परिस्थिती काय सांगते?

राज्य शासनाबरोबर सहकार्य करीत गेली ३२ वर्षे ग्रामीण भारतात मुलांच्या शिक्षणात स्वयस्फूर्तीने काम केल्यानंतर मी अगदी आशावादी आहे मला अगदी मनापासून हे होऊ शकेल असे वाटते. पण त्याकरिता शिक्षण क्षेत्रातल्या नोकरशाहीने आपल्या शिक्षणावरील नियंत्रणाचे स्वरुप बदलले पाहिजे. म्हणजे सरकारी सहभाग कमी व्हावा असे नाही. हे क्षेत्र खाजगी क्षेत्राला बहाल न करता सरकारने त्यांची घटनात्मक जबाबदारी पार पाडली पाहिजे. सामाजिक ध्येयासाठी त्याने मदतनीस बनले पाहिजे, स्वयंप्रेरणेने (शिक्षण पद्धती, शिक्षण प्रशिक्षण व शिकण्याशिकवण्यात) काम करणाऱ्या, सहयोग देणाऱ्यांना सामावून घेतले पाहिजे.

दूरशिक्षणात उपग्रह, टीव्हीचा वापर करण्यासाठी राजीव गांधींच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत, १९८९ साली एक साक्षरतेला सहाय्यक तंत्रज्ञानाची मोहीम उभारण्यात आली होती. आमच्यापैकी काहीजणांनी एक पर्यायी प्रयोग सुरु केला. अठरा महिन्यांच्या ठराविक कालावधी मधे एका जिल्ह्यातील हजारो कार्यकर्त्यांच्या सहभागाने लाखो लोकांना साक्षर बनवण्याची मोहिम काढायची! केरळच्या एर्नाकुलम जिल्ह्यात हा प्रयोग केला गेला. ताबडतोब यश मिळाले. ज्या सरकारी अधिकाऱ्यांनी हा प्रयोग पाहिला, ते आम्हाला म्हणाले सरकारने जर धोरण बदलून देशभर मोहीम राबवली तर तुम्ही सहकार्य कराल का? आम्ही भारत ज्ञान विज्ञान समिती

स्थापून राष्ट्रीय साक्षरता मोहिमेला सहकार्य केले. त्यापुढचा सगळा इतिहास बनला आहे. १९९० ते २००० साक्षरता मोहिमेमधे ५०० जिल्ह्यांतून एक कोटी वीस लाख कार्यकर्ते काम करु लागले आणि १९९१ व २००१ च्या जनगणनेत हिंदी भाषिक पट्ट्यांमधे न भूतो न भविष्यती असे १५% साक्षरता वाढीचे प्रमाण दिसले. जवळ जवळ १५ कोटी लोक साक्षरतेच्या वर्गांमधून शिकले.

आम्ही मध्यप्रदेशाच्या १४ जिल्ह्यांमधून गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाचे काम गेली ३० वर्षे केले. साक्षरता मोहिमेतल्या एर्नाकुलमसारखे प्रतिरुप प्राथमिक शिक्षणात, होशंगाबादला जिल्ह्याचे एक मॉडेल तयार केले.

त्याचबरोबर, सीखना-सिखाना (मध्यप्रदेश) लोकजुंबीश (राजस्थान), शैक्षणिक पुस्तकांचा प्रकल्प (केरळ) आणि वेगवेगळ्या ठिकाणचे प्रशिक्षण या सर्व अनुभवांना एकत्रित पाहिले तर जिल्हावार प्राथमिक शिक्षणात पुढाकार घेणे (DPEP पेक्षा पूर्णतः वेगळ्या पद्धतीने) शक्य आहे. त्यायोगे घटनात्मक बंधनांना येत्या दशकातही पूर्ण करणे शक्य होईल.

वर उल्लेखित केलेल्या आणि तत्सम तत्वांवर आधारित मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक, प्रगतीशील आणि वेगळा असा राष्ट्रीय पाठ्यक्रम आराखडा, त्याला पुरेसा अर्थपुरवठा यांच्या उपलब्धीमुळे घटनेने आखून दिलेल्या मर्यादित, १९६० साली संपलेल्या दशकात जे साध्य करता आले नाही ते आपल्या देशात येत्या दशकात करता येईल. आघाडीचे सरकार असा इतिहास घडवायला तयार आहे का?

(केब समितीसमोर मोफत व सक्तीच्या शिक्षण विधेयकासंदर्भात २२.११.२००४ रोजी केलेले भाषण)

अनुवादः प्रा. माधुरी दीक्षित

❑❑❑

सर्वांना शिक्षण?...काही सवाल!

दत्ता देसाई

२१ शतकातील समाज कसा असेल? एक उत्तर आहे की तो 'शिकणारा समाज' असेल. म्हणजे काय? तर चंगळवाद आणि उपभोगाचा हावरट आनंद यापलीकडे जाण्याचा त्याचा प्रयत्न असेल. लोक 'शिकण्याचा आनंद'घेऊ लागतील. 'ज्ञानमार्गास'लागतील! पण आपल्या देशात काय परिस्थिती असेल? जिथे कधीच शाळेत न गेलेली आणि शाळेतून बाहेर फेकली गेलेली अशी ५ कोटीहून अधिक मुलेमुली शिक्षणाच्या उंबरठ्याबाहेर उभी आहेत, तिथे काय परिस्थिती असेल?

पाच कोटी हा नुसता आकडा नव्हे. त्यातील प्रत्येक मूल त्याच्या दोन डोळ्यांनी आपल्याकडे पाहते आहे. त्यात कुतूहल आहे, उत्सुकता आहे, छोटीछोटी स्वप्ने आहेत, प्रचंड सुप्त शक्ती आहे, - आणि त्याचवेळी या डोळ्यांमध्ये उदासी आहे. कुपोषण उपासमार लपली आहे, भीती,विस्कटलेपणा आणि असुरक्षितता दडली आहे. शाळांमध्ये शिकणाऱ्या कमीअधिक मुलामुलींच्या डोळ्यांमधेही हेच भाव आहेत. आणि ते प्रश्न बनून आपल्यासमोर उभे आहेत.

देशाच्या कानाकोपऱ्यातील, वाड्यावस्त्यातील आणि डोंगरकपारीतील प्रत्येक मूल 'शिकण्याचा आनंद'कसा घेईल? स्वतःचे भवितव्य ते कसे घडवेल? देशाच्या विकासात 'शिकण्याच्या संस्कृती'ला सन्मान कसा मिळेल? यासाठी आवश्यक ते आर्थिक, नैतिक व राजकीय बळ कसे उभे राहील?

आज आपल्यासमोर असलेला प्राथमिक शिक्षणाच्या हक्काबाबतचा कायदा आणि नवा राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा हे दोन्ही यासाठी कसे, कुठवर आणि कितपत उपयोगी पडतील? हे दोन्ही हातात घेऊन लोक शिक्षणाचे लोकशाहीकरण कसे करु शकतील?

या प्रश्नांना हात घातल्याशिवाय 'शिकणाऱ्या समाजाकडे'आपण

एक पाऊलही टाकू शकणार नाही हा विसाव्या शतकाचा केवळ इशाराच नव्हे तर साक्षात अनुभव आहे.

सर्वांना शिक्षण : खरेच हवे आहे का?

आजही काही समज 'सार्वत्रिक' दिसतात. लोकांनाच शिकायची इच्छा नाही असे नोकरशाही म्हणते. 'खालच्या'जातींना शिकायलाच नको असे वरच्या जातीचे लोक म्हणतात. शिक्षणाविषयी आळस, अनास्था यामुळे लोक अशिक्षित राहतात असे उच्चशिक्षितांना वाटते, वगैरे वगैरे! पण वस्तुस्थिती काय आहे? काही नामवंत अर्थतज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञांनी काही वर्षापूर्वी उत्तर भारतातील काही राज्यातील १८८ खेड्यांची नमुना पाहणी केली होती. त्या आधारे 'प्रोब' नावाचा एक अहवाल प्रसिध्द केलेला होता. त्यातून काय दिसले? मुलामुलींना शिक्षण मिळावे असे बहुतांश पालकांना वाटते. मुलग्यांना शिक्षण हवेच असे ९८ टक्के पालकांना वाटते

मुले शाळेत न जाण्याची कारणे (प्रोब अहवाल)

अ. क्र.	मुलगे (१०० पैकी)	मुली (१०० पैकी)	कारणे
१.	२६	४९	कामे करुन घेतली जातात
२.	४३	४४	शिक्षण खर्चिक आहे.
३.	१५	८	शाळा खूप दूर आहे
४.	८	२	शाळेत शिक्षणाचा दर्जा वाईट
५.	२	१	शालेय वातावरण वाईट
६.	३	१	मूल अपंग
७.	६	४	पुरेसे हुशार नाही
८.	३२	१८	अभ्यासात रस किंवा गोडी नाही
९.	३७	३२	पालकांना शिकवण्यात रस नाही
१०.	२९	२३	इतर कारणे

तर मुलींचे शिक्षणही महत्वाचे आहे असे ८९ टक्के पालकांना वाटते. अशिक्षित पालकांपैकी ९९ टक्के पालकांनी मुलांच्या तर ८४ टक्क्यांनी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. सुशिक्षित पालकांत हीच टक्केवारी १०० टक्के अशी आहे.

थोडक्यात, लोकांना शिक्षणाचे महत्व मान्य आहे. मग अडचण कुठे आहे? पाहणीतून याबाबतीत काही गोष्टी पुढे आल्या आहेत.

बालमजुरी, दारिद्रय, घरच्या जबाबदाऱ्या अशी अनेक कारणे त्यामध्ये आहेत. अभ्यास आनंददायी, समर्पक, जीवनाशी जोडलेला नाही हे कारणही यामागे आहे. अशा या अडचणी दूर झाल्याशिवाय शिक्षण सार्वत्रिक कसे होणार?

थोडक्यात, लोकांना शिक्षण हवे आहे; मुद्दा ते उपलब्ध करुन देण्याचा आहे!

सर्वांना शिक्षण : शक्य आहे का?

बऱ्याचदा असा प्रश्न विचारला जातो की यासाठी लागणारा खर्च कसा भागवणार? पैसा आणि साधनसामुग्री कशी उभी करणार? भारतासारख्या देशाला हे कसे जमणार? कसे परवडणार? वगैरे वगैरे.

पण भारतापेक्षा लोकसंख्येने अधिक असलेल्या चीनला जर सर्वांना शिक्षण देणे जमू शकते तर आपल्याला का जमू नये? मानवी विकास निर्देशांकात (ज्यात साक्षरता-शिक्षण हाही एक निकष असतो) क्रमवारीत बांगला देश-श्रीलंका आपल्या पुढे म्हणजे ८०-९० व्या स्थानावर आहेत, आपण मात्र १२३ व्या स्थानावर! आणि आर्थिक बाबतीत आपण 'महासत्ता' बनतो आहोत, जगात ५ व्या -६ व्या स्थानावर पोचलो आहोत! या आर्थिक शक्तीचा छोटा भाग आपण शिक्षणावर का नाही लावू शकणार?

खरे तर आपल्या देशामध्ये शिक्षणावर होणारा खर्च हा इतर देशांच्या मानाने कमीच आहे. कोठारी आयोगापासून विविध धोरणे-समित्या यांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च शिक्षणावर व्हावा असे म्हटले आहे. मात्र सध्या राष्ट्रीय पातळीवर तसेच महाराष्ट्रात तर ३ टक्क्यांच्या आसपास आहे. योजनांमध्ये प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण कमी

होत चालले आहे. प्राथमिक शिक्षणावरील खर्च शिक्षकांचे पगार कसेबसे भागतील एवढाच आज केला जातो (त्यातही शिक्षणसेवक आणून कपात सुरु आहे) . आजच्या प्राथमिक शिक्षणावरील खर्चाच्या ९४ टक्के रक्कम ही या पगाराची होते. इमारती, बाके, पाणी, फळा, ग्रंथालये, प्रयोगशाळा, तक्ते, अन्य शिक्षणसाहित्य, स्वच्छता यासाठी पैसाच उपलब्ध केला जात नाही. मग सरकारी/निमसरकारी शाळा या कोंडवाडे वा गोठ्यासारख्या बनल्या तर त्यात काय आश्चर्य? मुलांना तिथे बसण्यापेक्षा उघड्या मैदानावर पळावेसे वाटले तर ते स्वाभाविकच नाही का? अशा परिस्थितीत त्यांचे शिक्षण होण्याचा मुद्दा मुद्दलातूनच बाद ठरतो.

तीच गोष्ट शिक्षकांच्या संख्येविषयी. साधारणपणे ३० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असे प्रमाण चांगल्या शिक्षणासाठी आवश्यक असते. पण ते पडते ५०/६०/७० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक. तर अनेकदा १२०/१५० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असे हे प्रमाण असते. थोडक्यात, आजच्या शिक्षक संख्येत महाराष्ट्रातसुद्धा किमान २५ टक्क्यांनी वाढ होणे आवश्यक आहे. (मग बिहार, उत्तर प्रदेशचे काय म्हणावे?) इमारतींपासून शिक्षण साहित्यापर्यंत सर्व गोष्टी पुरेशा उपलब्ध होण्याची गरज आहे. आणि या साऱ्यासाठीच शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण आजच्या किमान दुप्पट व्हायला हवे. सरकारकडे आणि देशात धनिक वर्गाकडे पैसा भरपूर आहे. प्रश्न आहे तो गोळा करण्याचा आणि प्राधान्याने शिक्षणावर वापरण्याचा.

मात्र इथे एक इशारा देणे आवश्यक आहे. शिक्षणावरील खर्चात वाढ करा अशी घाऊक वा ढोबळ मागणी करुन गप्प बसणे पुरेसे नाही. कारण सरकारी खर्चात वाढ व्हावी म्हणून नोकरशहा, कंत्राटदार आणि पुरवठादार हेही एकीकडे वाट पहातच असतात. इमारती बांधा, प्रंचड स्टेशनरी वा कॉंप्युटर खरेदी करा, नवनव्या योजना आणा....'आम्ही खूष! द्या आम्हाला नवनवी कुरणे' असे या मंडळींचे 'अर्थ'कारण असते.

म्हणून आपण या खर्चाच्याही तपशीलात शिरले पाहिजे. एक म्हणजे खर्च कशावर, कुठे व किती केला पाहिजे याबद्दलही जागे असले पाहिजे, तपासले पाहिजे, बोलले पाहिजे आणि आंदोलन केले पाहिजे. दुसरे, आजदेखील खर्चात प्रचंड उधळपट्टी, भ्रष्टाचार, अपव्यय आहे. कित्येक

ठिकाणी इमारत आहे पण शाळा 'साप्ताहिक' भरते. दोनतीन शिक्षक आहेत, पण शाळेत एखादाच डोकावतो. पुस्तके, तक्ते, प्रयोगसाहित्य, अगदी कॉम्प्युटरही आहेत पण ते धूळ खात पडले आहेत.

म्हणजेच शिक्षकांपासून ते शिक्षण साहित्यापर्यंत साऱ्याचा कार्यक्षम आणि पुरेपूर वापर करणे हेही त्याचवेळी आवश्यक आहे. त्यातून केवढा तरी मोठी पल्ला आपण गाठू शकू. या ठिकाणी आणखी एक इशारा देणे आवश्यक आहे. स्पर्धात्मक, 'आधुनिक', 'दर्जेदार' शिक्षण देण्याच्या नावाखाली देशी-विदेशी बलाढ्य कंपन्या त्यांचा माल शाळांमध्ये खपवत आहेत. शासकीय यंत्रणाही त्यांनाच साथ देते आहे. तेही रोखले पाहिजे.

अमर्त्य सेनांसारखे मध्यममार्गी अर्थतज्ज्ञही हे सांगत आहेत की शिक्षणाला देशाच्या विकासात आज सर्वाधिक प्राधान्य दिले पाहिजे आणि असे करणे हे अर्थशास्त्रीयदृष्ट्यादेखील केवळ शक्यच आहे असे नव्हे तर विस्तृत विकासासाठी ते आवश्यकही आहे. त्यासाठी पुरेशी साधनसामुग्री उभी करणे शक्य आहे. प्रश्न राजकीय इच्छाशक्तीचा आहे.

सर्वांना शिक्षण : म्हणजे कोणाला?

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी काही प्रयत्न नक्की झाले. धोरणे, कायदे, अनुदाने, सवलती, इमारती व अन्य साधने,

शिक्षणसंस्था, शैक्षणिक महाविद्यालये आणि संशोधनसंस्था.... असे बरेच काही घडले. शिक्षण अनेकविध जातीजमातीपर्यंत पोहोचले. तरी या साऱ्याचा लाभ कुणाला मिळाला? उच्च आणि मध्यमवर्गाने याचा मुख्य लाभ घेतला. मध्यम-तळातल्या जातीजमातींमध्ये छोट्या विभागांना व काही प्रमाणात याचा लाभ मिळाला. घोषणा सर्वांच्या कल्याणाची, पण लाभ मात्र एका मर्यादित वर्गाला असेच झाले. परिणामी आजही निम्मी लोकसंख्या निरक्षर, कोट्यवधी बालके शाळेबाहेर आणि आणखी बहुसंख्य मुलेमुली अर्धसाक्षर-अर्धशिक्षित आहेत. यात उच्चवर्णियांमधले अपवादानेही सापडतील का शंका आहे. मध्यम आणि तळच्या जाती, आदिवासी-भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्य, स्त्रिया आदी ग्रामीण-शहरी गरीब-कष्टकरी लोकच प्रामुख्याने आहेत. त्यामुळे आता 'सर्वांना शिक्षण' म्हणजे केवळ शिक्षित-सुस्थित वर्गाला केंद्रस्थानी ठेवून नव्हे तर खऱ्या गरजूंसाठी शिक्षण हा त्याचा अर्थ आहे. त्यासाठी उपेक्षित जाती वर्गातील मुलांमुलींना भिडणारी, सामावून घेणारी, शिक्षणव्यवस्था आवश्यक आहे. नव्या कायद्यात त्यासाठी काही तरतुदी आहेत. त्या टिकवल्या पाहिजेत, अधिक बळकट केल्या पाहिजेत. त्यासाठीच्या धोरणांची, उपायांची, सोयीसवलतींची गरज अधोरेखित केली पाहिजे.

येत्या काळात शिक्षणाचा हक्क व आशय या दोन्हीचेही सूत्र आपण घट्ट पकडले पाहिजे. त्यातूनच सर्वांना शिक्षण मिळण्याची आणि परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान होऊ शकेल.

शिक्षण कशासाठी : फेरविचार हवा?

'सर्वांना शिक्षण ' याचा अर्थ केवळ, शिलकी कामे कशीबशी आटपणे व आजचे शिक्षणच सर्वांना देणे एवढेच उद्दिष्ट असता कामा नये. आजवरच्या शिक्षणाने निर्माण केलेले प्रश्न इथून पुढे मुळापासून उखडून टाकायचे असतील, तर मुळात 'शिक्षण कशासाठी' याचाच नीट विचार होण्याची गरज आहे.

'शिक्षण कशासाठी' याची काही नेहमी दिली जाणारी उत्तरे आहेत: 'देशभक्त तयार करण्यासाठी' 'देशाच्या विकासासाठी', 'समाजाच्या

कल्याणासाठी', 'चांगला नागरिक तयार व्हावा', 'उत्पादक घटक तयार व्हावा', 'सर्वांगीण विकासासाठी', 'अज्ञान आणि अंधश्रद्धा यातून सुटका होण्यासाठी', 'जगण्याची कौशल्ये मिळवण्यासाठी' इ.

यात काही प्रमाणात तथ्य आहे. पण मुळात ही 'बोजड' उद्दिष्ट्ये शिक्षणाला ओझे बनवण्याला कारणीभूत झाली आहेत. आता हवे याला छेद देणारे शिक्षण. प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमतांचा विकास व हक्कांचा समान आदर करणारे शिक्षण. ज्या शिक्षणाने मुलीला (व्यक्तीला) या समाजात स्वतःसाठी एक जागा निर्माण करता येईल, तशी मान्यता तिला दिली जाईल. शिक्षणाने तिच्यात प्रश्न विचारण्याची, ते हाताळण्याची व सोडवण्याची क्षमता आली पाहिजे. शिकण्याच्या, निरीक्षणाच्या, कृतीच्या, क्रियाशीलतेच्या व निर्मितीच्या तिच्या सर्व क्षमता फुलून आल्या पाहिजेत. आपले जीवन आणि भोवतालचा परिसर तिला वाचता आला पाहिजे, त्याबाबतची तिची समज वाढली पाहिजे आणि गरजेप्रमाणे त्या दोन्हीत तिला बदल घडवता आला पाहिजे. योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, या साऱ्या मूल्यांचा चिकित्सकपणे निर्णय करता आला पाहिजे. अशी क्षमता, अशी दृष्टी व कौशल्ये विकसित होणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. मुलीचा/मुलाचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक व भावनिक विकास संतुलित पद्धतीने होणे हे त्यासाठी आवश्यक ठरते.

शिक्षणातील वेगवेगळे विषय, लिहिण्या-वाचण्या-मोजण्याची कौशल्ये, उत्पादक कौशल्ये, नागरिकत्वाचे-देशाचे-जगाचे भान, नीतिमत्ता या गोष्टी तिच्या शिक्षणाचे विषय व साधने म्हणून निश्चित महत्वाच्या आहेत. पण त्याचवेळी या स्थलकालपरत्वे बदलणाऱ्या असतात. उदाहरणार्थ आजचे नागरिकत्वाचे नियम हे तिच्यातील क्षमता व

माणूस मारत असतील, किंवा 'देशभक्ती वा विकास' ही कल्पना स्वतःच्या व अन्य देशातील काही माणसांवर अन्याय करत असेल तर? मग ते शिक्षणाचे उद्दिष्ट कसे बनू शकेल? उलट त्याची तपासणी करून त्याबाबत निर्णय घेण्याची क्षमता तिच्यात यावी हेच आपण म्हणू शकतो. तेच धर्म, नीतिमूल्ये वा विचारसरणींबाबत म्हणता येईल. हे सारे 'बाहेरुन', पढीक पद्धतीने देण्यापेक्षा त्याबाबत सारासार विचार करण्याची क्षमता तिच्यात यावी हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

इथून पुढच्या काळात स्वतःचे आणि समाजाचे भवितव्य घडवण्याची व बदलत्या जगाची आणि जग बदलण्याची आव्हानेही पेलू शकेल अशी 'स्वावलंबी व्यक्ती' निर्माण होणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. तेच प्रत्येक व्यक्तीला भिडू शकते, तिला आणखी शिकण्याला प्रेरित करु शकते.

अशी 'शिकण्याची प्रेरणा' जागावी हेच खरे तर शिक्षणाचे सर्वात योग्य उद्दिष्ट नाही काय?

शिक्षणाचा आशय काय? पद्धत कोणती?

शिक्षणाच्या उद्दिष्टांचा पुनर्विचार म्हणजे त्याच्या आशयाचा व पद्धतीचा फेरविचार करणे हे ओघाने आलेच. पण हा विचार आणखीही काही कारणांसाठी आवश्यक आहे. एकतर शिक्षण नीरस-कंटाळवाणे असल्यामुळे होणाऱ्या गळतीचे प्रमाण मोठे आहे. त्यांमुळे सर्वांना शिकावेसे वाटेल असे शिक्षण असावे ही तातडीची गरज आहे. पण याला आणखीही एक पैलू आहे. प्रचलित शिक्षणाचा आशय व पद्धती हे काही विभागांना सोयीचे तर काहींना गैरसोयीचे ठरते. उदा., घोकंपट्टीची पंतोजी पद्धत किंवा कपाटात वस्तू कोंबल्याप्रमाणे डोक्यात 'ज्ञान' भरण्याची पद्धत (बँकिंग कन्सेप्ट ऑफ नॉलेज) ही 'ज्ञान' मिळवण्यासाठी अशास्त्रीय व घातक आहे. कारण त्यातून स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता मारली जाते आणि जीवनातून, अनुभवातून, कृतीतून शिकण्याची व ज्ञान मिळवण्याची प्रक्रियाही मार खाते. प्रश्न विचारण्याऐवजी ओझे वागवण्याची, ते वाहण्याची आणि मुंडी हलवण्याची किंवा ओझे लादण्याची व 'होय बां'ना जवळ करण्याची वृत्ती तयार होते. प्रस्थापित रचनेसमोर, सत्तेसमोर मान झुकवण्याची वृत्ती

तयार होते. समाजातील सर्व वर्चस्ववादी, दादागिरी करणाऱ्या व हुकूमशाही गाजवणाऱ्या शक्तींना शरण जाण्याची प्रवृत्ती समाजात बळावते.

पण यामध्ये आणखी एक गोष्ट दडलेली आहे. ज्यांना परंपरेने घोकंपट्टी व स्मरणशक्ती यांच्या जोरावर ज्ञान संपादण्याची व मिरवण्याची सवय आहे अशा वर्ग-जातीतले विद्यार्थी हेच अधिक यशस्वी ठरतात. जे प्रत्यक्ष श्रम करतात, उत्पादनात, कारागिरीत, शेतात, जंगलात राबत असतात, जे निरीक्षण व अनुभवातून ज्ञान गोळा करत असतात-थोडक्यात जे शास्त्रीय पद्धतीने ज्ञान ग्रहण करण्याच्या जवळ असतात- ते 'अयशस्वी' ('ड्रॉप आउट') ठरतात. त्यातले जे खूप कष्ट घेतात, घोकंपट्टी-स्मरणशक्ती पद्धत अंगिकारतात ते मूठभर पुढे सरकतात. ही पद्धती व तिला बळकट करणारी परीक्षा पद्धती यामुळे 'चाळणी' लावली जाते. सामाजिक उतरंडीला जोडून एक शिक्षणाची उतरंड तयार होते. या उतरंडीच्या विविध पायऱ्यांवर मुला-मुलींना त्यांच्या 'पायरी' नुसार ('लायकी'नुसार) बसवले जाते. यातील मूठभर 'यशस्वी' 'चमकणारे' 'हुशार' 'तारे' हे आजच्या व्यवस्थेत 'वर' - अधिकारी, तज्ज्ञ, नोकरशहा, व्यवस्थापक वा चालक-मालक म्हणून बसतात, उरलेले सारे कर्मचारी-कामगार-रोजंदार म्हणून कामाला जुंपले जातात. शिकवण्याची प्रचलित पद्धत ही शोषण व विषमतेवर आधारलेल्या समाजरचनेला पोषक ठरते. ज्ञानाच्या क्षेत्रातील उतरंड व विषमता टिकवते. म्हणून ती बदलून सर्वांना योग्य अशी पद्धत आणण्याची गरज आहे.

देशातील बहुसंख्य लोकांना सोयीची आणि खऱ्या अर्थी शास्त्रीय पद्धत कोणती असेल? तर मुळात ती मूल आणि शिक्षक या दोघांवर विश्वास टाकणारी हवी. ती जीवनाशी, अनुभवांशी व कृतीशी जोडलेली आणि संवाद,

निर्मिती क्षमता व समज वाढवणारी शिक्षणपद्धती हवी. ही पद्धत केवळ 'शिकवणारी' (Teaching) नसेल तर ती 'शिकण्याला मदतकारक' (Facilitating the Learning) ठरणारी असेल आणि ती आजवर दुर्लक्षित, उपेक्षित वर्गजातींना न्याय देणारी, वाव देणारी ठरेल. शिवाय हीच पद्धती '१०० टक्क्यांना' म्हणजे सर्व माणसांना शिकण्यासाठी सुयोग्य पद्धत आहे हे आता जगभरचे शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, संस्था, प्रयोगकर्ते व मानसशास्त्रज्ञ सांगत आहेत. त्यामुळे ही पद्धती कोणाही गटाला किंवा विभागाला वगळणारी नसेल, ती 'चाळणी' लावणारी नसेल, उतरंड-विषमता जोपासणारी नसेल तर खऱ्या अर्थी सार्वत्रिक असेल.

या शिकण्यातले आशय-विषय हे स्थानिक परिसर-परिस्थितीतून जीवनाशी जोडून घेणारे असावे लागतील, पण त्यातून ते फक्त 'स्थानिक' ज्ञान देणारे नसतील तर सर्व जगाबद्दलही ते समज विकसित करु शकतील. स्थानिक ज्ञान हा एक बिंदू असेल आणि त्याची व सामाजिक, वैश्विक, वस्तुनिष्ठ व शास्त्रीय ज्ञान यांची एकमेकांशी जैव सांगड व पडताळणी सततपणे घालावी लागेल. स्थानिक ज्ञान शिक्षणात आणणे याचा अर्थ मुलामुलींची दृष्टी 'स्थानिकवादी', संकुचित करणे नव्हे. तसेच स्थानिक ज्ञानात चुकीच्या परंपरा, अशास्त्रीय समज, पूर्वग्रह, अंधश्रद्धा, पर्यावरण विरोधी सवयी तसेच जात, लिंग, जमात याच्याशी निगडीत विषम जाणिवा असू शकतात. हे खऱ्या अर्थी 'जीवनशिक्षण' बनायचे तर या साऱ्याबाबत आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवावा लागेल. या संदर्भातच उच्च तंत्रज्ञानाचा-माहिती तंत्रज्ञानाचा विचार करावा लागेल. अगदी आदिवासी पाड्यापर्यंतच्या शिक्षणात 'कॉंप्युटर इंटरनेट-इंटरॲक्टीव्ह/सेल्फस्टडी'(स्वयंअध्ययन) याचाही वापर केला पाहिजे. त्याची काही प्रमाणात मदतही होईल हे खरे. हे सारे प्रत्येक मुलामुलीला हाताळता/शिकता आले पाहिजे. पण शिक्षणातील सर्व प्रश्नांवर उच्च/माहिती तंत्रज्ञान स्वीकारा की आपोआप 'सर्वांना शिक्षण' उपलब्ध होईल असे जे आज भासवले जात आहे ते दिशाभूल करणारे आहे.

कारण आज इंटरनेट हे जगातील ११-१२ टक्के लोकांपर्यंत पोहचते आहे. भारतासारख्या विषमताग्रस्त देशात ते किती जणांपर्यंत पोचले आहे? फारतर २.० टक्क्यापर्यंत! आजच्या परिस्थितीत त्यातून

ज्ञानाच्या क्षेत्रातील मक्तेदारी व विषमता वाढेल की कमी होईल? जिथे अक्षरओळख नसलेली काही कोटी बालके आहेत तिथे 'संगणक साक्षरता' कशी येणार? परिसराचा व जीवनाचा अनुभव व कृती यांना 'व्हर्चुअल रिॲलिटी' हा पर्याय ठरु शकत नाही, शाळेच्या वर्गाला टीव्हीचा डबा हा पर्याय ठरु शकत नाही,आणि प्रत्यक्ष शिकवण्यात कॉंप्युटर हा शिक्षकाला कधीही पर्याय ठरु शकत नाही. हे विसरल्यास मूल/माणूस हा स्वावलंबी होण्याऐवजी (उच्च तंत्रज्ञानावर) 'परावलंबी' बनेल! शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच धोक्यात येईल.

थोडक्यात, शिक्षण हे सार्वत्रिक, आनंददायी व अर्थपूर्ण व्हायचे तर त्याच्या आशय-पद्धती याबाबत आमूलाग्र विचार करावाच लागेल. नवा अभ्यासक्रम आराखडा या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे. मात्र हा प्रश्न केवळ तज्ज्ञांवर वा शासनावर सोडून भागणार नाही. तर असे 'जीवनशिक्षण' हे शिक्षणविषयक चळवळीचा व लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनावे लागेल.

घटनेत तरतूद, लोकचळवळ आणि समाजपरिवर्तन

स्वातंत्र्यपूर्व काळापासून जी मागणी होती तिचा पुनःपुन्हा पुनरुच्चार करुन, संघर्ष करुन शेवटी प्राथमिक शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून घटनेत समाविष्ट झाला' आणि आता त्याच्या अंमलबजावणीसाठीचा कायदा संसदेत मांडला जाणार आहे. त्यामुळे हा प्रश्न धसाला लावायला घटनात्मक कायदेशीर आधार मिळतो आहे हे खरे.

पण एवढे झाल्याने प्रश्न सुटणार नाही. घटनेत किंवा कायद्यात कितीही चांगल्या तरतुदी असल्या तरी त्या प्रत्यक्षात येण्यासाठी खूपच संघर्ष करावा लागतो. आज समोर आलेल्या कायद्याच्या मसुद्यात काही त्रुटी आहेत. म्हणून अधिक लोककेंद्री तरतुदींसाठी आणखी संघर्ष आवश्यक आहे. उदा. ० ते ६ वयोगटातल्या मुला-मुलींच्या बौद्धिक-शारीरिक विकासासंदर्भात शिक्षणाचा हक्क या घटनात्मक-कायदेशीर तरतुदीत नाही. सर्व वर्ग-जातींच्या मुलामुलींसाठी सामाईक शाळा व समान गुणवत्तापूर्ण शिक्षण असले पाहिजे. त्याविषयीही कायद्यात तरतूद नाही. अशा अनेक

मुद्दांचा विचार चिकित्सकपणे केला पाहिजे.

याबरोबरच देशातील आर्थिक धोरणांचा संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे शिक्षण क्षेत्राचे वेगाने व्यापारीकरण केले जात आहे. शिक्षण ही बाजारपेठेतील विकाऊ वस्तू (क्रयवस्तू) बनवली जात आहे. बाजारव्यवस्था ही माणसाची 'गरज' वा 'हक्क' ओळखत नाही. ती फक्त 'मागणी' ओळखते. जो पैसा देईल त्याचीच गरज भागवते. ही प्रक्रिया सर्वग्रासी होत निघाली आहे. तिच्या रेट्याखाली या नव्या कायद्यातील चांगल्या तरतुदींना छेद देण्याची वा त्या नावापुरत्या कागदोपत्री ठेवण्याची 'व्यवस्था' केली जाईल. म्हणून याबाबतची जनजागृती आणि संघर्ष हे सातत्याने जारी ठेवावे लागेल.

हा संघर्ष धोरणात्मक-कायदेशीर बदलांसाठी तर करावाच लागेल पण त्याचवेळी शाळा मंजूर करा, शाळा चालू ठेवा, शिक्षक नेमा, शिक्षकांची-मुलांची उपस्थिती वाढवा, साहित्य उपलब्ध करा, अपव्यय-भ्रष्टाचार टाळा, गणवेश-आहार द्या, शिकण्या-शिकवण्याला आजच्या चाकोरीतून बाहेर काढून जीवनाशी-परिसराशी जोडा, या प्रत्येक मुद्दयावर संघर्ष करावा लागेल. कायद्यातील सर्व निकषांचे पालन होते की नाही हे पहावे लागेल.

हा संघर्ष केवळ मागण्यांपुरताही मर्यादित ठेवून भागणार नाही. तर शिक्षण हा विषय विकेंद्रित व्यवस्थांशी जोडावा लागेल. उदा. गावोगावच्या ग्रामशिक्षण समित्या कार्यरत व्हाव्यात, त्यांचे व पंचायत व्यवस्थेतील संस्थांचे (ग्रामपंचायत, तालुका पंचायत इ.) अधिकार वाढावेत आणि या साऱ्यातून लोकसहभाग वाढावा यासाठी चळवळ उभी करावी लागेल. पालकांमध्ये जागृती वाढावी, पालकांचा सहभाग शिक्षणप्रक्रियेत असावा यासाठी संवाद साधावा लागेल.

आज महाराष्ट्रात सार्वत्रिक शिक्षण व पर्यायी शिक्षणाचे अनेक सुटेसुटे प्रयोग चालू आहेत. त्यांची एकत्रित शक्ती उभी राहायला हवी. लोकसहभाग हा विषय खाजगी व 'स्वयंसेवी' धंदेवाईकांच्या ताब्यात कसा जाणार नाही हे पहावे लागेल. या संबंधी काम करणाऱ्या विविध संस्था, संघटना यांच्याशी तसेच विद्यार्थी, महिला व कष्टकरी चळवळी यांनी एकमेकांशी नाते जोडावे लागेल.

या साऱ्यातून शिक्षणाचे एक नवे वातावरण निर्माण करावे लागेल. आजवरची चाकोरी हेच अंतिम उत्तर न मानता, 'संवाद, उभारणी व संघर्ष' या तिन्ही पातळ्यांवर कार्य करावे लागेल- 'शिक्षण ही समाजाची, प्रामुख्याने शासनाची, जबाबदारी आहे आणि ते सध्याची समाजव्यवस्था टिकवण्याचे-चालवण्याचे साधन नसून व्यक्तीच्या व समाजाच्या परिवर्तनाचे माध्यम आहे-' हे सूत्र न सोडता त्याबाबतचा संघर्ष विविध पातळ्यांवर व विविध रुपात लढवावा लागेल. त्यासाठी एक व्यापक व सखोल चळवळ उभी करावी लागेल.

काहींच्या मनात एक शंका नक्की येईल - शिक्षणाविषयीचे आपले 'स्वप्न' व त्याच्याशी सुसंगत असे राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्याने मांडलेले शिक्षण सर्वांना मिळणे हे आजच्या समाजव्यवस्थेत कसे शक्य आहे? कारण कितीतरी मुलेमुली गरिबीमुळे-बालमजुरीमुळे शिकू शकत नाहीत. प्रचलित व्यवस्थेमध्ये सर्वसाधारण सरकारी धोरणे सर्वसामान्यांच्या बाजूची होऊच शकत नाहीत, शिक्षणाची उद्दिष्ट्ये, आशय, पद्धती हे उच्चवर्गाच्या सोयीचीच राहणार, इ. रास्त आक्षेप पुढे येऊ शकतात. त्यामुळे जोवर आजची समाजव्यवस्था पूर्ण बदलत नाही म्हणजेच जोवर सामाजिक क्रांती होत नाही तोवर सर्वांना शिक्षण मिळणार कसे? 'शिक्षण आणि समाज' याकडे आज वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. प्रचलित कुचकामी लोकविरोधी शिक्षणापासून सुटका करून घेण्याचा मार्ग म्हणजे 'शाळाच नको' (Deschooling) असे कधी कधी गांभीर्यपूर्वक मांडले जाते. दुसरीकडे आजच्या शिक्षणातले दोष काढून टाकायचे तर त्याला सरकारी-सार्वजनिक क्षेत्रातून बाहेर काढून 'बाजारात' उभे करा असे म्हंटले जाते. तिसरीकडे, सध्याच्याच शिक्षणात काही जुजबी सुधारणा केल्या की सारे काही आलबेल होईल असे मानले जाते. पण आजच्या शिक्षण व्यवस्थेत असे गंभीर दोष आहेत की, जे जुजबी उपायांनी जाणार नाहीत. बाजारपेठेचा उपाय हा तर 'रोगापेक्षा इलाज विषारी' असा ठरेल. तो बहुसंख्य लोकांना शिक्षणापासून वंचित करू पाहील, एवढेच नव्हे तर शिक्षणाचा आशयही 'व्यापारी' करेल आणि शिक्षणाला तो सामाजिक व मानवी मुक्तीच्या ध्येयापासून दूर नेईल. शिक्षणाची 'शाळापद्धती' रद्द करणे

हा तर आजच्या टप्प्यावर भारतातील जनतेच्या दृष्टीने उपाय ठरुच शकत नाही. तर 'बिनभिंतीच्या' शाळेकडे वाटचाल करणे आणि ज्ञान-शिक्षण-श्रम-जीवन-आनंद-निर्मिती-समाज-नैतिकता व मुक्ती या साऱ्यांना एकत्र गुंफण्याची दिशा ठेवणे हे आज आवश्यक आहे. आजच्या ठोस समाज वास्तवाचे भान ठेवून या 'मुक्तिच्या' दिशेने जाण्यासाठी शिक्षणाच्या हक्काचा कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा हे सहाय्यकारी ठरु शकतात. ही दोन नवी हत्यारे ज्ञान-विज्ञानाचे लोकशाहीकरण आणि सामाजिक परिवर्तनासाठी निश्चितपणे उपयुक्त ठरु शकतात.

हे खरे आहे की वर म्हटल्याप्रमाणे शिक्षणात सर्वंकष परिवर्तन पूर्णत्वाला जायचे तर आमूलाग्र समाजपरिवर्तन होण्याची, एक सामाजिक क्रांतीची गरज आहे. पण शिक्षण क्षेत्रातून त्या दिशेने कसे जायचे?

गरिबी, विषमता हे सारे असूनही गेल्या १००/१५० वर्षात देशातील कोट्यवधी लोकांनी शिक्षणासाठी धडपड केली. त्याची सांगड राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याशी घातली, सामाजिक समतेसाठीच्या संघर्षाशी घातली आणि शिक्षणात व लोकांच्या जीवनात निश्चित असे बदल घडविले. आज नव्या संदर्भात हा संघर्ष पुढे नेण्याची गरज आहे. 'अंडे आधी की कोंबडे आधी' अशा त्रांगड्यात न अडकता पुढे तो नेता येऊ शकतो. नव्या शिक्षणव्यवस्थेसाठी सर्वांगाने संघर्ष उभारत गेल्यास तो परिवर्तन लढ्याचा भाग बनू शकतो. सामाजिक क्रांती आणखी जवळ आणू शकतो. शिक्षणाची खरी उद्दिष्ट्ये क्रांतीनंतरच पूर्णार्थाने साकार होतील हे खरे पण त्या प्रक्रियेची सुरुवात आजपासून, आत्तापासून आणि आजच्या प्रत्येक प्रश्नाला भिडण्यापासून होऊ शकते. परिवर्तनवादी शिक्षणाच्या माध्यमातून शोषित-उपेक्षित जनतेच्या काही क्षमता वाढू शकतात. व्यवस्थेविषयीची लोकांची समज व जागृती वाढू शकते. यातूनच सर्वांना गुणवत्त्वापूर्ण शिक्षण देणारी शिक्षण व्यवस्था व समता-बंधुता देणारी समाजव्यवस्था यासाठीच्या सामाजिक क्रांतीसाठीचे प्रयत्न पुढे सरकू शकतात.

❑❑❑

शिक्षणाची गुणवत्ता: केरळमधील प्रयोग

डॉ. अनिता रामपाल

एक: शिक्षणाचा नवा कार्यक्रम

शाळेतील वर्गांचे बदलते स्वरूप

शिक्षणाच्या कोणत्याही नवीन कार्यक्रमामध्ये मुले आनंदाने सहभागी होतात, मात्र त्यांचे पालक आणि शिक्षक हे त्याबद्दल जरा साशंकच असतात. शाळेच्या स्वरूपात जेव्हा मूळापासून बदल केले जातात आणि नेहमीची 'निष्क्रिय' शिक्षणपद्धती बदलून मुलांच्या क्रियाशील सहभागाची पद्धत स्वीकारली जाते, तेव्हा त्याविषयी शिक्षक आणि पालक साशंक असल्याचे वारंवार दिसून येते. ही नवीन शिक्षणपद्धत शिक्षकांना जरा कठीण जाते, कारण त्यांच्या दृष्टीने नेहमीच्या 'भाषण' पद्धतीने शिकवणे जास्त सोपे असते ! पालकांना आणि प्रसारमाध्यमांनाही नवी पद्धत म्हणजे केवळ 'नाचगाणी' असे वाटते. त्यांच्यावरही पारंपारिक शिक्षणविषयक विचारांचा पगडा असतो. त्यामुळे 'गहन अध्ययन' याचा अर्थ मुलांनी शांत आणि गंभीर वातावरणात पेन-कागद वापरून 'खर्डेघाशी' करणे असेच अपेक्षित असते. केरळमधील शाळेच्या अभ्यासक्रमातील बदल हा केवळ सरकारी आणि अनुदानित शाळांपुरता मर्यादित आहे. त्यातून खाजगी विनाअनुदानित शाळांना वगळल्यामुळे पालकांमध्ये खूपच शंकेचे वातावरण आहे. पालकांना असे वाटते की शिक्षणाची ही पद्धत जर जास्त चांगली आहे, तर ती खाजगी शाळांमध्ये का अवलंबली जात नाही?

पण लोकांच्या या शंका-कुशंकांना बाजूला सारले तर काय दिसते? या नव्या अभ्यासक्रमाला मुलांनी दिलेला प्रतिसाद लक्षणीय आहे. वर्गात होणाऱ्या विविध कार्यक्रमात मुलांनी स्वतःहून सहभागी होणे आणि त्यातून शिकलेल्या गोष्टी त्यांनी करणे यातूनच बदलांचा परिणाम दिसून यायला

हवा. हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आम्ही केरळमधल्या सहा जिल्ह्यांतील जवळजवळ वीस शाळांच्या वर्गांची जवळून पहाणी केली. आम्ही भेट दिलेल्या बहुतेक सर्व शाळांमध्ये मुले आणि शिक्षक यांच्यात वातावरण खेळीमेळीचे आणि मैत्रीपूर्ण असल्याचे जाणवले. सर्वसाधारणपणे आपल्या देशात शिक्षक म्हणजे छडीच्या सहाय्याने मुलांना वळण लावणारा अत्यंत कडक कायदेरक्षक ही प्रतिमा रूजलेली आहे. त्यामुळे बहुदा मुलेदेखील निष्क्रिय होऊन शिक्षकाच्या आदेशांचे तंतोतत पालन करत असतात. पण आम्ही भेट दिलेल्या शाळांमधले चित्र हे या नेहमीच्या पायंड्याला छेद देणारे आणि अधिक प्रसन्न होते. मुले शिक्षकांच्या शिकवण्याला अत्यंत मोकळेपणाने, फारशी भिती न बाळगता प्रतिसाद देत होती. खरे तर कुठल्याही चांगल्या शैक्षणिक वातावरणाचे हे मूलभूत तत्त्वच म्हणायला हवे.

शाळेच्या वर्गांमध्ये जाणवण्याइतपत बदल घडत आहेत. ज्या शाळांची 'कडक शिस्त' हीच परंपरा चालत आलेली आहे त्यासुद्धा अनिच्छेने का होईना पण हे स्वीकारू लागल्या आहेत की मुलांना अधिकाधिक मोकळीक (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) देण्याची गरज आहे. चिन्नकानल येथील अनुदानित (FMLP) शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर फरेरा त्यांचा अनुभव सांगताना विनोदाने म्हणाल्या की 'आधी आमच्या शाळेतील कडक शिस्त आणि नीटनेटकेपणा यामुळे मुले पुस्तकावर फक्त स्वतःची नावं लिहायची. पण आता या नवीन कार्यक्रमामुळे मुले अत्यानंदाने पुस्तकातील कागदाच्या घड्या घालण्यापासून ते फाडून त्यांची विमाने बनवणे आणि पाहिजे तिथे पुस्तकावर लिहिणे असे नाना प्रकार करतात. त्यामुळे आता मुले बऱ्याचदा माझ्या नियंत्रणाबाहेर जातात.' मात्र त्यांनी हेही ठामपणे सांगितलं की, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी त्या समाधानी आहेत. त्यांचे बहुतेक विद्यार्थी हे अत्यंत गरीब आणि हलाखीच्या परिस्थितीतून आले आहेत, शाळेच्या वसतिगृहाची देखभाल ते स्वतःच करतात, त्यांची शिकण्यातील प्रगती चांगली आहे आणि त्यांच्यामधील आत्मविश्वासही वाढत आहे.

'शिक्षकाने कसे दिसावे आणि कसे असावे' याबाबत स्वतःच्या

स्वरूपाबद्दलच्या कल्पना शिक्षकवर्गात अत्यंत खोलवर रूजल्या आहेत आणि त्यात बदल करणे अवघड आहे. बहुदा शिक्षक 'स्वतःचा शब्द अंतिम' ही प्रतिमा पुसण्यास तयार नसतात. केरळमध्ये आम्हाला असेही दिसून आले की, काही शिक्षक अजूनही त्यांची 'सांगाती' - छडी - जवळ बाळगून असतात ! फळ्यावर लिहिलेले मुद्दे दाखवण्यासाठी छडीचा उपयोग (Pointer) म्हणून करता येतो असे ते म्हणतात ! अर्थात मानसिकता बदलणे जरा कठीणच असते! अजूनही काही लोकांना वाटते की, मोकळीक देणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हानिकारक आहे. त्यांच्या मतानुसार मुलांना कडक शिस्तीतच ठेवले पाहिजे. त्यांना त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे! काही घटना अशाही होऊ लागल्या आहेत की, मुलेच आपल्या शिक्षकांनी छडी उपयोगात आणल्याबद्दल विरोध करण्यास पुढे सरसावत आहेत. तिरूअनंतपुरममधल्या एका सरकारी शाळेत ४थीत शिकणाऱ्या ऋषीने आम्हाला सांगितले की, एकदा त्याने त्यांच्या शिक्षकांना नव्या कार्यक्रमामध्ये छडी चालत नाही याची जाणीव करून दिली, तर त्या शिक्षकाने तेवढ्याच तत्परतेने आणि चिडखोरपणे त्याला सुनावले की, 'माझ्या वर्गामध्ये छडी राहाणारच'!

आणखी एक विशेष घटना. काही मुलांनी त्यांच्या शिक्षकाने त्यांना केलेल्या मारहाणीच्या विरोधात एक लेखी तक्रार पोलिस कॉन्स्टेबलकडे दिली. त्यात त्यांनी लिहिले होते की, असे करणे हे उपशिक्षण अधिकाऱ्यांनी (DEO) काढलेल्या परिपत्रकाच्या विरूद्ध आहे. मलप्पुरमच्या उपशिक्षण अधिकाऱ्यांनी छडी वापरणे आणि वर्गामध्ये लष्करी जवानांसारखी शिक्षा देणे यावर बंदी घालणारी सूचना एका परिपत्रकाद्वारे जारी केली होती. या परिपत्रकामुळे शिक्षक वर्गात असंतोष पसरला, कारण अप्रत्यक्षपणे ही सूचना म्हणजे आपल्या विद्यार्थ्यांचा नेहमी छळ करणाऱ्या काही शिक्षकांना इशारा होता. हे परिपत्रक म्हणजे केरळमधील 'मुलांच्या आवडीची शाळा' या संकल्पनेशी विविध घटकांचे असलेले नाते दर्शविणारे एक उदाहरण आहे. या पत्रकात असेही म्हंटले आहे की, 'शाळांमधून मुलांचा वारंवार छळ केला जात असल्याचे निदर्शनास येत आहे आणि हा प्रकार मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला आणि संवर्धनाला मारक आहे. शिक्षक हा एक उदात्त

पेशा किंवा व्यवसाय आहे. तो मनुष्यातील सृजनाला घडवत असतो. शिक्षकाने मुलांशी संवेदनशीलतेने वागले पाहिजे. प्रत्येक मुलाच्या विकासाला पुरेपूर वाव दिला पाहिजे आणि शिक्षकाने मुलांना छळणारे साधन बनू नये. श्री.बशीर यांच्यासारखे याबाबतीत संवेदनशील असलेले सन्माननीय अपवाद वगळता, या क्षेत्राशी संबंधित मंडळीमध्ये मुलांच्या विकासाविषयी एक प्रकारची अनास्था आणि प्रशासकीय कोरडेपणा जाणवतो, पण 'मुलांच्या आवडीचा वर्ग' या संकल्पनेवर जास्तीत जास्त भर दिल्यामुळे शैक्षणिक प्रशासनालादेखील या मुद्याची गांभीर्याने दखल घ्यावी लागत आहे.

नवी दृष्टी, नवे स्वप्न

केरळने स्वीकारलेल्या नव्या अभ्यासक्रमातील (नसन्स) 'विद्यार्थी केंद्रीत वर्ग' यावर अधिकाधिक भर दिला आहे. खरे तर केरळमधल्या या शैक्षणिक सुधारणांच्या मागे असलेला जो मुलभूत विचार आहे, त्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, भोवतालचा समाज आणि शाळा चालवण्यास सहाय्यभूत ठरणारी यंत्रणा या प्रत्येकाची भूमिका विस्तृत आणि स्पष्टपणे मांडली आहे. वर्गातील वातावरण याबाबत मांडलेले काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

'आम्हाला आमच्या शाळा या कृतिशीलतेवर आधारित व विद्यार्थी-केंद्रित प्रयोगशीलतेतून शिक्षण देणाऱ्या हव्या आहेत, जिथे मुले स्वतःमधील अंगभूत क्षमतांचा पुरेपूर उपयोग करून स्वतःच ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करतील'.

आमच्या शाळा या खऱ्याअर्थी शिक्षणाची केंद्रे व्हावीत, जिथे -

➢ कुठल्याही कठीण प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी लागणारा आत्मविश्वास प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वाढीस लागेल,

➢ तिला आपल्या वर्गातील मित्र-मैत्रिणी, शिक्षक आणि शैक्षणिक साधने यांच्याबरोबर मोकळेपणाने, अर्थपूर्णरित्या आणि आनंदाने सुसंवाद साधता येईल,

➢ इतरांशी संवाद साधण्यात आणि शाळाबाह्य साधनांचा उपयोग करून

स्वतःच्या ज्ञानकक्षा वाढवण्यात ती रस घेईल,

➤ सभोवतालच्या घटना, वस्तुस्थिती आणि स्वतः शोधलेल्या गोष्टी यांचा विचारपूर्वक परस्परसंबंध जोडेल, त्यावरून तर्कसुसंगत अनुमान करण्याची क्षमता विकसित होईल,

➤ स्वतःच्या कामाचे मूल्यमापन तिला स्वतः करता येईल, त्यातील उणिवा शोधून शिक्षक-पालकांच्या सहाय्याने त्यावर मात करता येईल,

➤ ती न डगमगता व स्वतःहून कामे हाती घेईल आणि त्याला सहाय्यक ठरणाऱ्या वाचन-साहित्याची साधनांची निवड देखील स्वतः करेल.

आमच्या शाळा सुसंवादाची अशी केंद्रे बनावीत, जिथे -

➤ वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या वेगवेगळ्या क्षमता लक्षात घेऊन शिक्षक कृतींची/कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी करतात,

➤ मुलांना हवे तेव्हा आणि गरज लक्षात घेऊन मदत आणि मार्गदर्शन करतात,

➤ नवनवीन कल्पना आणि तंत्रे विकसित करून त्याचा वर्गामध्ये वापर करतात,

➤ सामुहिक कार्यक्रमात सहभागी करून घेताना प्रत्येकाच्या नैसर्गिक गुणांना पुरेपूर वाव देतात,

➤ प्रत्येकाच्या आकलन/क्षमतेनुसार त्याला काम सोपवून त्याबाबतच्या सूचना देतात,

➤ वर्गातील कृतींसाठी आणि ज्ञान अद्ययावत करण्यासाठी स्थानिक साधन-सामुग्रीचा उपयोग करतात,

➤ आपल्या शिकवण्याच्या पद्धतीविषयी मुलांच्या प्रतिक्रिया जाणून घेतात, त्यांची वेळोवेळी नीट नोंद ठेवतात आणि स्वतःच्या शिकवण्यामध्ये अपेक्षित सुधारणा करतात,

➤ वर्गातील अडीअडचणींचा अभ्यासपूर्वक विचार करून त्यातून मार्ग काढतात,

➤ स्वतःच्या सहकारी शिक्षकांबरोबर शैक्षणिक चर्चा करून शाळेचे स्त्रोत-गट आणि सहाय्य-गट यांच्या सामूहिक नियोजनात सहभागी होतात.

आम्हाला वाटते की विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी सामग्री -

➤ ही प्रामुख्याने स्थानिक दृष्ट्या आणि गरजेनुसार उचित असावी

➤ या शालोपयोगी वस्तू मुलांनी शिक्षक आणि तज्ञ मंडळी यांच्या मदतीने स्थानिक साहित्यापासून स्वतः बनवलेल्या असाव्यात.

मुलांच्या शिक्षणाबद्दलचे लोकांचे विचार

वरील मुद्दे हे नेहमीप्रमाणे केवळ कागदोपत्री न ठेवता मोठ्या प्रमाणात लोकांच्या चर्चेचा विषय बनत आहेत. या प्रक्रियेत स्थानिक जनतेचा खुला सहभाग बघून अस्वस्थ होणारे व विनाकारण विरोध करणारे काही लोकही आहेत, पण लोकांच्या सहभागामुळे केरळमधील या कार्यक्रमाला अधिक बळ आले आहे. पालक, पंचायत समित्या आणि राजकीय मंडळी यांच्यासारखे घटक या कार्यक्रमात प्रत्यक्षपणे जोडले जात आहेत. त्यांच्यामध्ये या नव्या अभ्यास प्रक्रियेविषयी चर्चा होत आहे. केरळमध्ये या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करून बरीच वर्षे झाली असली तरी आमचे सर्वेक्षण चालू असताना अजूनही तेथील वृत्तपत्रे आणि टी व्ही वाहिन्या त्याविषयी वृत्तांत देताना आम्हाला आढळले.

दोन: अभ्यासक्रम आणि शिकण्या-शिकवण्याची साधने

पाठ्यपुस्तक : निर्मिती आणि सुधारणा

केरळात नवीन पाठ्यपुस्तके तयार करण्याआधी, जुन्या पुस्तकांमध्ये असमाधानकारक काय आहे याबद्दल मोठ्या प्रमाणावर चर्चा आयोजित केल्या होत्या. यामध्ये पालक, शिक्षक आणि समाजातील इतर घटक सहभागी झाले होते. 'पाठ्यपुस्तके : का आणि कुणासाठी?' या नावाचा एक लेख या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर वाचला आणि चर्चिला गेला. यशपाल समितीच्या अहवालावर आधारित या लेखाने अभ्यासक्रमातील बदलांबाबत अनेक प्रश्न समोर आणले. शिक्षकांच्या या संदर्भातील मतांचा यात आढावाही घेण्यात आलेला आहे. त्यातून असे समोर आले की मुलांमध्ये विविध कौशल्ये/क्षमता निर्माण करणे, त्यांच्या सामूहिक कृती घेणे, आणि बहुस्तरिय शिक्षणाचा विचार करणे इत्यादींसाठी जुनी पुस्तके अनुरूप नाहीत.

त्यानंतर पाठ्यपुस्तक तयार करण्यामध्ये सर्जनशील शिक्षक, तज्ज्ञ, कलाकार वगैरेंचा सक्रीय सहभाग जाणीवपूर्वक घेतला गेला. यामधून तयार झालेली पाठ्यपुस्तके आणि शिक्षणासाठीची सटीप हस्तपुस्तके अर्थातच इतर राज्यांपेक्षा चांगली आहेत. परंतु पाठ्यपुस्तक निर्मिती ही प्रक्रिया सतत चालू राहिली पाहिजे. म्हणून आता पुन्हा पाठ्यपुस्तकांची सुधारित आवृत्ती काढणे आणि अभ्यासक्रमाचा पुन्हा आढावा घेणे गरजेचे आहे.

नवीन पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीनंतर नव्या दृष्टिकोनाबद्दल व

अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांबद्दल पालकांना जागरूक करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. त्यासाठी पालक-शिक्षक संघ (स श) आणि माता-शिक्षक संघ (श) यांचा माध्यम म्हणून उपयोग झाला. जिथे असा संवाद झाला तिथे पालकांना या नव्या पुस्तकांचे स्वागत केले आणि वर्गातील शिकवण्याच्या नव्या पद्धतीला पाठिंबा दिला. काही पंचायतीनी पालकांनी नवीन अभ्यासक्रम समजावून देणारी पुस्तिका छापली होती, ती प्रतिनिधींनी अभिमानाने आम्हाला दाखवली. जे पालक या उपक्रमामध्ये सहभागी होऊ शकले त्यांना शाळेमध्ये मुलाची प्रगती चांगली झाल्याचे लक्षात आले. ज्या पालकांना यामध्ये सहभागी होता आले नाही ते मात्र याबाबत साशंक आहेत आणि विरोधी प्रचाराला बळी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बदललेल्या अभ्यासक्रमाबद्दल आणि त्यामुळे झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल पालकांशी आणि एकूण समाजाशी संवाद साधत रहाणे गरजेचे आहे. आणि आता आपल्यासमोर केवळ नवा दृष्टिकोनच आहे असे नव्हे तर प्रत्यक्ष परिणामही समोर आहेत. असा संवाद विशेषकरून भाषा शिक्षणाबाबत आवश्यक आहे, कारण त्याबाबत लोकांमध्ये अविश्वास, शंका, चुकीच्या कल्पना आहेत. एका प्रशिक्षकाने आपला अनुभव सांगितला की जेव्हा त्याने स्वतःच्या एकोणतीस वर्षांच्या सेवेमध्ये प्रथमच शिक्षकांनी बनवलेली स्थानिक पाठ्यपुस्तके बनविलेली पाहिली तेव्हा तो भारावून गेला. त्याने आम्हाला ती हस्तलिखित पाठ्यपुस्तके व शिक्षकांची हस्तपुस्तके दाखवली. अनेक प्रशिक्षकांनी सांगितले की शिक्षकांना आता नवी पाठ्यपुस्तके हवी आहेत, कारण शिक्षणाची एकात्मिक पद्धत असलेला हा उपक्रम आता रूजला आहे. प्रशिक्षकांच्याही मते ही पुस्तके स्थानिक गरजा जास्त चांगल्या पद्धतीने भागवू शकतात. परंतु सर्व प्रशिक्षकांना अजून स्थानिक पुस्तके तयार करण्याइतका आत्मविश्वास आलेला नाही. त्यांची तशी इच्छा आहे परंतु त्यांना त्यासाठी जास्त शैक्षणिक अनुभव/प्रशिक्षण व अभ्यासाची गरज वाटते.

हा उपक्रम गेल्या काही वर्षात हळूहळू विकसित होत गेला आहे आणि पर्यावरण शिक्षणासारख्या काही विषयांमध्ये त्यात विशेष बदल झालेला आहे. त्यामुळे प्रकल्पाधारित दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून पाठ्यपुस्तके

आणखी बदलण्याची गरज आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. आणि पाठ्यपुस्तके ही अभ्यासक्रमाच्या पाठीमागून न बदलता अभ्यासक्रमाशी जैव नाते ठेवून त्याच्या बरोबरीने बदलली पाहिजेत असे आम्हाला वाटते. पुस्तकांची प्रत्येक आवृत्ती ही तज्ज्ञ, शिक्षक व विद्यार्थी यांच्या कामातील अनुभवाने आणि नव्या कल्पनांनी समृद्ध असली पाहिजे. यामुळे हा उपक्रम जिवंत व सर्जनशील राहील आणि प्रशासन व नोकरशाहीच्या चाकोरीच्या खातेऱ्यात अडकण्यापासून वाचेल !

पाठ्यपुस्तके बनविण्याची प्रक्रिया विकेंद्रित करणे आणि भाषिक, भौगोलिक व सांस्कृतिक विविधता लक्षात घेऊन स्थानिक गरजा भागवतील अशी पुस्तके निर्माण करणे यामुळे लोकांच्याही सर्जनशीलतेला वाव मिळतो. त्यांना हा उपक्रमही आपला वाटू लागतो.

गणित शिकवण्याचा मार्ग

विविध विषय शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धती स्पष्ट करणाऱ्यांसाठी तयार केलेले मार्गदर्शक लेख हे अभ्यासक्रम विकसित करताना फार उपयोगी पडले. गणित शिक्षणाचा आराखडा तर फारच उत्तम आहे आणि त्याआधारे तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम अतिशय परिणामकारक ठरला आहे. इतर राज्यांच्या आणि इतर काही देशांचा अनुभव गणिताची नावड निर्माण होण्याचा आहे, तर येथील अनुभव उलटआहे. येथील विद्यार्थ्यांना आता गणित शिकण्यात आनंद वाटतो आणि त्यांची प्रगतीही खूपच चांगली आहे. चौथीचे विद्यार्थी आता साध्या अंकगणितात आठवीतील विद्यार्थ्यांच्या पुढे आहेत. गणितावरील मार्गदर्शक लेखात जुन्या पद्धतीने गणित शिकवण्यातील अडचणी आणि त्यांची कारणे याचे विवेचन केलेले आहे. गणिती संकल्पना प्रत्यक्षात कशा तयार होतात हे स्पष्ट केले आहे. रोजच्या व्यवहारातून विद्यार्थ्यांच्या मनात अंकसंकल्पना कशी आकार घेऊ शकेल याचे एक उदाहरण या लेखात दिले आहे. पाठांतराने व यांत्रिक पुनरावृत्तीने शिकण्याच्या मर्यादा दाखवून देऊन हा लेख विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण शिकण्याच्या संधी कशा देता येतील ते सुचवतो. जगात इतरत्र बऱ्याच ठिकाणी आता पद्धतीने गणित शिकवले जाते आणि एक परिणामकारक

पद्धत म्हणून या पद्धतीला मान्यता मिळाली आहे. गणिताचे पुस्तक याला अनुरूप असे तयार केले गेले आहे. यात अनेक उपक्रम, कोडी आणि खेळ आहेत. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गोष्टी व अर्थपूर्ण गणिते देण्यावर भर आहे. विद्यार्थ्यांनाही स्वतः प्रश्न तयार करून ते गटांमध्ये बसून सोडवता येतात. यांमुळे गणित हा विषय आता भीतीदायक न राहता मनोरंजक, ज्ञानवर्धक आणि जीवनाशी जोडलेला विषय झाला आहे.

अभ्यासक्रमाचा आढावा

चालू अभ्यासक्रमामध्ये विविध कौशल्ये आणि क्षमतांना वाव देणाऱ्या एकात्मिक उपक्रमांऐवजी विशिष्ट कौशल्ये वा क्षमतांवरच भर दिला जातो. प्रत्यक्ष जीवनातील ज्ञानाशी आणि विविध व्यवसायांशी शिक्षण कसे जोडले जाईल यावरही विचार होणे आवश्यक आहे.

पर्यावरण अभ्यास आता प्रकल्पाधारित पद्धतीने शिकवण्याचा प्रयत्न उपयोगी ठरत आहे. आणि या विषयावरच्या आजवरच्या पद्धतीचा पूर्ण आढावा घेण्याची गरज त्यातून स्पष्ट होते. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अनुभव लक्षात घेता आता संपूर्ण अभ्यासक्रमाचाच आढावा घ्यायची गरज आहे. उदाहरणार्थ, तिसरीच्या अभ्यासक्रमातील 'वनस्पतींच्या पानांचे कार्य' व त्याचे सोपेपणासाठी केलेले 'वनस्पतींचे स्वयंपाकघर' असे वर्णन या दोन्ही गोष्टी अनावश्यक आहेत. या वयातील विद्यार्थ्यांसाठी ही केवळ निरर्थक, पोकळ विधाने आहेत. त्यांना प्रकाशसंश्लेषण किंवा हरितद्रव्य या संकल्पना झेपणाऱ्या नाहीत. तसेच 'वनस्पतींचे स्वयंपाकघर' यासारख्या चुकीच्या उपमांचे ओझेही नको !

याचप्रमाणे संशोधनाने असे दिसते की अगदी १३-१४ वर्षाच्या विद्यार्थ्यांनादेखील पृथ्वी गोल आहे हे कळण्यास जड जाते. त्यामुळे हे तिसरीच्या अभ्यासक्रमात नसावे. तसेच चौथीच्या अभ्यासक्रमातील सूर्यमालिका, ग्रहांचे तापमान आणि त्यांची दृश्यता यांचा अंतराशी संबंध स्पष्ट करणारे प्रयोग इत्यादि गोष्टी या वयातील विद्यार्थ्यांसाठी योग्य नाहीत. यामुळे चुकीच्या कल्पना किंवा माहिती पोहोचण्याचीच शक्यता जास्त

असते. याउलट निरीक्षणे करणे, कल्पकतेने विचार करणे आणि प्रश्न विचारणे यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे योग्य ठरेल.

गणितामध्येसुद्धा, तिसरी-चौथीच्या अभ्यासक्रमात सर्जनशीलता आणि कौशल्यांचा अंतर्भाव करता येईल. तसेच अभ्यासक्रम हा अंक व त्यावरील क्रिया यावरच मर्यादित न ठेवता फरशीच्या नक्षी वा मधील सममिती; परंपरागत 'वर्तुळ, त्रिकोण' वगैरेंच्या ऐवजी विविध आकार; मोजमापाचा अंदाज, राशी आलेख स्वरूपात दाखवणे वगैरेचे उपक्रम यामध्ये अंतर्भूत करता येतील.

पाठ्यपुस्तक वापरावे की नाही?

शाळांना भेटी देताना आमच्या असे लक्षात आले की शिक्षकांना पुस्तक वापरण्याची गरज वाटत नाही. काही विशेष गरज लागेपर्यंत विद्यार्थ्यांनाही पुस्तक उघडायला सांगितले जात नाही. पुष्कळदा आम्ही भेट दिलेल्या वर्गांमध्ये पुस्तके मुलांच्या दप्तरात 'सुरक्षित' होती! शिक्षकांचे पुस्तकावर अती अवलंबून रहाणे नव्या अभ्यासक्रमाने दूर केलेले असले तरी पुस्तके न वापरणे हे म्हणजे दुसरे टोक गाठणे आहे.

अभ्यासक्रम लक्षात घेऊन स्वतःच पाठांचे नियोजन करून शिकवणे व विद्यार्थ्यांसाठी स्वतः उपक्रम तयार करणे याचा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये आला आहे ही कौतुकाची गोष्ट आहे. काही प्रशिक्षकांनी शिक्षकांना साधारण १/३ वेळ पाठ्यपुस्तके वापरण्यास व बाकी पूरक साहित्य वापरण्यास सुचविले आहे. परंतु शिक्षक फारच कमी वेळ पाठ्यपुस्तके वापरत आहेत आणि पाठ्यपुस्तके वापरणे ही जणू वाईट गोष्ट आहे असा त्यांचा ग्रह झालेला आहे. याकडे आता जास्त चिकित्सकपणे बघण्याची गरज आहे. याशिवाय आतापर्यंतचा अनुभव पाहता अभ्यासक्रमात सांगितलेली विशिष्ट कौशल्ये आणि क्षमता यापेक्षा जास्त भर एकात्मिक उपक्रम किंवा प्रकल्पांवर विशेषतः परिसर अभ्यासाबाबत दिला पाहिजे.

आम्हाला असे वाटते की या पाठ्यपुस्तकांवर अतिशय परिश्रम

घेण्यात आलेले आहेत, ती नवीन पद्धतीची गरज भागवू शकतात आणि म्हणून त्यांचा वर्गामध्ये जास्त सक्रिय वापर झाला पाहिजे. या पुस्तकाचे इतरांनीसुद्धा मूल्यमापन केले आहे आणि ही पुस्तके केरळमधे नसन्स ने शिक्षणात केलेल्या बदलाचा एक महत्वाचा भाग मानली जातात. पाठ्यपुस्तक ही विद्यार्थ्यांच्या पूर्ण हातातली गोष्ट आहे आणि बऱ्याच विद्यार्थ्यांकडे वाचनासाठी तेवढीच एकच गोष्ट असते कारण त्यांना दुसरे काहीही परवडत नाही. याशिवाय या पुस्तकांद्वारे पालकांनाही वर्गात काय चालू आहे यांवर लक्ष ठेवता येते, शाळेत काय चालते याची कल्पना येते. तसेच वर्गात चालू असलेल्या गोष्टींची माहिती मूल घरी आत्मविश्वासाने देऊ शकते. अर्थात पाठ्यपुस्तक आंधळेपणाने वापरावे असे येथे सुचवायचे नाही, तर ते सर्जनशीलतेने वापरले जावे म्हणायचे आहे.

शिक्षकांसाठी हस्तपुस्तके आणि पूरक पुस्तके

पहिली ते चौथीच्या पाठ्यपुस्तकांबरोबर शिक्षकांसाठी सटीप हस्तपुस्तके तयार करण्यात आली आहेत. दुसऱ्या दिवसाचे नियोजन करताना शाळेच्या शेवटच्या तासाला शिक्षक त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेतात असे दिसून आले आहे. तसेच, विशेषकरून सुरुवातीच्या काळात, त्यांना 'कारूका' नियतकालिकाचा नव्या कल्पनांसाठी आणि उपक्रमांसाठी खूप उपयोग झाला 'कारूका'ची एक विशेष आवृत्ती शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विद्यार्थ्यांचे कसे स्वागत करावे, वर्गातील गाणी व उपक्रम इत्यादिंबद्दल सूचना देते. तसेच स्वातंत्र्यदिन, येणारा पावसाळा वगैरे निमित्ताने एकात्मिक उपक्रम कसे घेता येतील ते सुचवते.

विशिष्ट विषयांवर छोट्या-छोट्या पुस्तकांच्या मालेची आज गरज आहे, हे पुन्हा एकदा जोर देऊन सांगितले पाहिजे. त्याचा उपयोग शिक्षकांना स्वतःच्या शंकांचे समाधान करण्यासाठी होऊ शकेल. अनेक गोष्टींवर प्रशिक्षणाच्या वेळी जरी चर्चा होत असली तरी पुस्तकांच्या रूपाने शिक्षकांच्याकडे एक कायमस्वरूपी संदर्भ राहाणे आवश्यक आहे. शिवाय ही पुस्तके इतर (नसन्स नसलेल्या) जिल्ह्यातही या कल्पना पोहोचवण्यास

उपयोगी ठरतील. उदा., विद्यार्थ्यांचे मूल्यमापन. विद्यार्थी साधारणपणे कोणत्या चुका करतात व त्या सुधारण्याचे मार्ग कोणते हे या पुस्तक मालिकेमध्ये चर्चिले जाऊ शकेल. या मालिकेतील इतर पुस्तके 'संपूर्ण व सततचे मूल्यमापन' विद्यार्थ्यांच्या 'प्रतिसादाचे व ज्ञानग्रहणाचे पान', 'विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे मूल्यमापन' अशी असू शकतील. अशाच प्रकारे इतर महत्वाच्या विषयांवरही मालिका असाव्यात आणि त्या शिक्षकांबरोबरच, पालक, शिक्षण विभागातील तज्ज्ञ व अधिकारी, पंचायत शिक्षण समिती यांसारख्यांसाठीही लाभदायक ठरतील अशाही असाव्यात. याशिवाय शिक्षकांच्या स्वतःच्या ज्ञानवृद्धीसाठी सुद्धा विविध विषयांवरील, उदा. साहित्य, इतिहास, विज्ञान, त्यातील नाती, इत्यादिवरील पुस्तकेसुद्धा तयार करता येतील.

अनुवाद : अभय/अर्चना

(डॉ.अनिता रामपाल/अहवाल : करिक्युलम चेंज फॉर क्वालिटी एज्युकेशन, केरळ/२००१/युनिसेफ व सी.एस.ई.एस.)



मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार विधेयक २००५

"भारतातल्या ६ ते १४ वयोगटामधल्या सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मिळणे (मोफत) हा त्यांचा मुलभूत अधिकार समजला जाईल" ह्या मुख्य मुद्द्याला केंद्रस्थानी ठेऊन शिक्षणाचा अधिकार-२००५ या कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. ८६ व्या घटना दुरुस्तीच्या परिणामी हे विधेयक संसदेसमोर आले आहे. ८६ व्या दुरुस्तीमुळे घटनेत खालील बदल झाले:

कलम २१ (नव्याने घातलेले) : ६ ते १४ वयोगटातल्या सर्व मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे हे सरकारवर बंधनकारक राहील

कलम ४५ (दुरुस्त केलेले) : ६ वयापर्यंतच्या मुला-मुलींची काळजी घेतली जाईल व त्यांना शिक्षण मिळेल हे पाहणे शासनाचे काम असेल

कलम ५१ - ए (के) (नव्याने घातलेले) : ६ ते १४ वयोगटातील आपल्या मुलांना शिक्षणाची संधी मिळवून देणे हे प्रत्येक पालकाचे हे कर्तव्य आहे.

आधीच्या एनडीए सरकारने जो विधेयकाचा मसुदा केला होता त्यामध्ये शिक्षणाची सर्व जबाबदारी पालकांवर टाकली होती. अनौपचारिक शैक्षणिक केंद्रे, शिक्षक सेवक या सारख्या जागतिक बँक प्रणित DPEP मधील प्रथा ज्या सर्व शिक्षा अभियाना मध्ये ही चालू राहिल्या. त्याला कायदेशीर मान्यता देण्याचा प्रयत्न केला होता.

UPA सरकारने शिक्षणाकरिता सल्ला देणाऱ्या केंद्रीय बोर्डावर (CABE) नव्या लोकांना घेतले. या बोर्डाच्या सात समित्यांपैकी एका समितीला विधेयक बनवण्याते काम दिले. या समितीत डॉ. विनोद रैना (महासचिव, भाज्ञाविस) हे एक सदस्य आहेत. विज्ञान तंत्रज्ञान खात्याचे मंत्री कपील सिब्बल यांच्या अध्यक्षतेखाली या विधेयकाच्या समितीने काम केले.

हे विधेयक श्री. कपील सिब्बल यांनी मानव संसाधन विकास मंत्रालयात सादर केले. यामध्ये कमिटीने तयार केलेले मूळ विधेयकातील काही मुद्दे गाळले व काही बदलले. मध्यंतरीच्या काळात मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी त्यावर काम केले व आता जे विधेयक मंत्रालयाच्या वेबसाईटवर आहे. तेच पुढे देत आहोत. यावर बरीच चर्चा होवू शकते.

शिक्षणासाठीची लढाई पिढ्यान्‌पिढ्या सुरु आहे. सर्वसामान्यांना विशेषतः महिलांना व दलितांना शिक्षण मिळावे यासाठी जोतीराव फुले व सावित्रीबाईंनी १५० वर्षापूर्वीच कंबर कसली होती. देशामध्ये सर्वप्रथम बहुजनांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि आज स्वातंत्र्यानंतर तब्बल अठ्ठावन्न वर्षानंतर प्राथमिक स्तरापर्यंत तरी मोफत शिक्षणाचा अधिकार मिळतोय याचे स्वागत करायला हवं.

या कायद्याच्या बरोबरच एनसीईआरटीने जो अभ्यासक्रमाचा नवा मसुदा जाहीर केला आहे तोही लक्षात घेणे महत्वाचे आहे. त्याचा संदर्भही या कायद्यामध्ये आहेच.

प्राथमिक शिक्षणाचा अधिकार २००५ या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर देशभरातील ६ ते १४ वयोगटातल्या कोट्यावधी मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे सरकारसाठी बंधनकारक ठरणार आहे.

प्रस्तावित कायदा, सादर झालेल्या स्वरुपात, शिक्षणाला मुलभूत अधिकार म्हणून मान्यता देताना शाळेची भूमिका, विद्यार्थी-शिक्षक-पालक आदी घटकांसाठी काय काय विचार करतोय हे आपण जाणून घेऊ या. याशिवाय शिक्षणात समाजाचा विशेषतः पालकांचा सहभाग त्याबरोबरच विविध पातळीवर सरकारची काय जबाबदारी आहे याविषयी प्रस्तावित मसुद्यात काय म्हटले आहे हे थोडक्यात बघू.

मुलांविषयी

♠ कायदा मंजूर झाल्यानंतर १ वर्षाच्या आत सर्व मुले-मुली शाळेत दाखल झाली पाहिजेत. (कलम ३.२ (i))

♠ ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना समान गुणवत्तेचे मोफत आणि सक्तीचे

शिक्षण देणे या कायद्याने बंधनकारक असेल. शाळेची सोय मुलांच्या घराजवळील शाळेत केली जाईल. (कलम ३.२ (i))

♠ जर एखादे मूल काही कारणांनी शाळेत जाऊ शकत नसेल (उदा. अपंगत्व) किंवा विशेष क्षमता असणाऱ्या मुलांसाठी योग्य वातावरण, शैक्षणिक साहित्य, प्रशिक्षित शिक्षक इ. मिळणे मुलांचा हक्क राहील. (कलम ३.२ (ii))

♠ हा कायदा लागू होताना ७ ते ९ वयोगटातील आणि ९ ते १४ वयोगटातली शालाबाह्य मुले विशेष कार्यक्रम राबवून शिक्षण पूर्ण करतील याची काळजी घेतली जाईल. (कलम ३.२,३,४)

♠ प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मुलाला शाळेतून काढून टाकता येणार नाही. (कलम ३.५)

♠ आठवीपेक्षा कमी वर्गांपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळांनी (उदा. चौथीपर्यंत) आपला मुलांना पुढील दाखल्याची सोय जवळच्या शाळेत करुन द्यावी. (कलम ४.१)

♠ मूल जर पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या शाळेत (अगदी दुसऱ्या राज्यातल्या) जाणारे असेल तर शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा सोडल्याचा दाखला द्यावा. पण एखाद्या मुलाकडे असा दाखला नसेल तर ते एखाद्या शाळेत प्रवेश नाकारण्याचे कारण ठरु शकणार नाही. (कलम ४.२)

♠ कुठल्याही शाळेत प्रवेश देताना मुलांची मुलाखत घेण्यास बंदी. (कलम ४.२)

♠ वयाची चौदा वर्षे पूर्ण झालेल्या पण प्राथमिक शिक्षण अपूर्ण रहिलेल्या सर्वांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याच्या सोयी मोफत उपलब्ध करुन दिल्या जातील. अर्थात्‌ या सोयी त्या मुलांचे वय अठरा वर्षे होईपर्यंतच दिल्या जातील. बालकामगार मुला-मुलींसाठी हे महत्वाचे आहे. (कलम ५.८)

♠ कुठल्याही मुलांना शारिरीक शिक्षा शाळांमध्ये दिली जाणार नाही. अशी शिक्षा देणे हा गुन्हा समजला जाईल. (कलम ३०.१)

♠ आठवीपर्यंत बोर्डाच्या परीक्षा कायद्याने घेता येणार नाहीत. (कलम २९.१)

शिक्षकांविषयी

या प्रस्तावित कायद्यात शिक्षकांना काही महत्वाचे अधिकार देऊन त्यांच्या कर्तव्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा आहे.

शिक्षकांची कर्तव्ये

• शिक्षकांनी शाळेत नियमित हजर रहावे. (कलम २५ (१))

• वर्षाचा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण करणे ही शिक्षकांची जबाबदारी राहील.(कलम २५ (२))

• सातत्याचे मूल्यमापन व विद्यार्थ्याला मदत करणे आणि पालकांना त्याविषयीची माहिती देणे हे शिक्षकांचे काम आहे. (कलम २५ (६))

• **पालक बैठकीला येत नसतील तर व्यवस्थापनाला रिपोर्ट करणे.**

• मुख्याध्यापक/शाळा व्यवस्थापन समितीला रजा मंजूर करण्याचे अधिकार असतील. (कलम २६.१ (i))

• शिक्षकांचा पगार शाळा व्यवस्थापन समिती /पंचायत समिती मार्फत होईल. (कलम २६.१ (ii))

• कर्तव्ये न पाळणाऱ्या शिक्षकाबाबत योग्य त्या नेमणूक/नियुक्ती अधिकाऱ्याकडे शाळा व्यवस्थापन/ग्राम पंचायतीला जाता येईल. (कलम २६.१ (iii,iv))

शिक्षकांची भरती व अधिकार

★ शिक्षकांची भरती ही स्थानिक अधिकारी/शाळा व्यवस्थापन समिती करेल.मनपा परिसरातील भरती योग्य सरकार ठरवेल. (कलम २२ (१))

★ शिक्षकांच्या बदल्या केल्या जाणार नाहीत. मात्र एखाद्या शाळेत भरती करायची असल्यास इतर शाळेतल्या शिक्षकाची (इच्छा असल्यास) त्याला/तिला त्या पदासाठी रीतसर अर्ज करता येईल.(कलम २२.२)

★ कोणत्याही सरकारी/अनुदानित शाळेतल्या एकूण शिक्षक पदांच्या १०% पेक्षा जास्त जागा रिक्त ठेवता येणार नाहीत. (कलम २३.१)

★ जे शिक्षक NCTE ने ठरवल्याप्रमाणे प्रशिक्षित नसतील त्यांना व्यवस्थापनाने पाच वर्षात असे प्रशिक्षण घेण्याची तरतूद करून द्यावी. या प्रशिक्षणाचा खर्च व्यवस्थापनाने करावा लागेल.(कलम २४.२)

★ शिक्षकांना पैसे घेऊन खाजगी शिकवणी घेता येणार नाही. (कलम २०)

★ दशवार्षिक जनगणना, निवडणुका आणि आपत्ती व्यवस्थापन याशिवाय कोणत्याही अशैक्षणिक कामात शिक्षकांची नेमणूक करता येणार नाही. (कलम १९)

पालकांविषयी

♦ ६ ते १४ वयोगटातल्या आपल्या पाल्याला शाळेत जाण्याची संधी उपलब्ध करुन देणे हे सर्व पालकांचे घटनादत्त कर्तव्य आहे.

♦ वारंवार पाठपुरावा करुन देखील जे पालक या कर्तव्यात कसूर करतील त्यांना स्थानिक समिती शाळेची कामे "शिक्षा" म्हणून करायला लावेल.

♦ आपल्या पाल्याला मोफत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घराजवळ मिळत नसेल तर संबंधित घटकांविरुध्द पालक तक्रार करु शकतील.

♦ शाळा व्यवस्थापन समितीवर ५०% पालकांचे प्रतिनिधित्व असेल. (कलम २१.३ (ii))

शाळेसंबंधी

♦ सर्व मुलांना घराशेजारील शाळेत (सरकारी) मोफत प्रवेश दिला पाहिजे. पूर्व प्राथमिकला हाच नियम लागू होईल. (कलम ३.१व२)

♦ अनुदानित शाळेत २५% मुलांना मोफत प्रवेश व शिक्षण देणे बंधनकारक. (कलम १४.१ (iii))

♦ शाळांना देणगी शुल्क घेता येणार नाही. (कलम १५)

♦ विद्यार्थ्याला प्रवेश शक्यतो शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला दिला जावा. काही कारणांनी मूल उशीरा आल्यास केव्हाही त्या/तिला प्रवेश मिळावा. (कलम १६)

♦ उशीरा आलेल्या विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम शक्यतो त्यावर्षी पूर्ण करुन घ्यावा. अशा मुलांची प्रगती बघून त्याला/तिला वरच्या वर्गात टाकावे. (कलम १६)

♦ शाळेसाठी दिलेल्या निकषांच्या पूर्ततेशिवाय/दर्जाशिवाय शाळा काढण्यास परवानगी देता येणार नाही. (कलम १७.१)

♦ ३ वर्षात अस्तित्वात असलेल्या शाळांनी (अनुदानित) निकष पूर्ण करणे बंधनकारक असेल. (कलम १७ .२)

♦ इतर शाळांसाठी निकष पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद सरकारने करावी. (कलम १७.३)

♦ शाळा व्यवस्थापन समितीने पैसा स्वतंत्र खात्यामध्ये ठेवणे व सांगितलेल्या गोष्टींवर खर्च करणे हे बंधनकारक राहील. (कलम २१.४)

♦ शाळा आणि व्यवस्थापन कमिटी (SMC) यांनी मिळून शाळेच्या विकासाचेही वार्षिक, मधल्या काळाचे व दूरगामी नियोजन करावे. कलम (१३.१)

सरकारची जबाबदारी

♦ सर्व मुलांना घराशेजारी शाळा उपलब्ध करुन देणे. (कलम ५.१)

♦ शाळा लांब असेल तर वाहनांची सोय करणे. (कलम ५.२)

♦ सर्वांना शाळांमध्ये मोफत शिक्षण मिळेल हे पहाणे. (कलम ५.२)

♦ प्रत्येक मुलाचा दर्जा सुधारतो आहे किंवा नाही, यासाठी आवश्यक पावले उचलणे व तशी देखरेख करणे.(कलम ५.३)

♦ सर्वांना समान गुणवत्तेचे शिक्षण दिले जाते किंवा नाही हे पहाणे. (कलम ५.४)

♦ शिक्षणासाठी आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक, लैंगिक, व्यवस्थापकीय, भौगोलीक अशा कोणत्याही प्रकारची बंधने येणार नाहीत हे पहाणे. (कलम ५.५)

केंद्र सरकारची जबाबदारी

♦ राज्य सरकारशी संवाद करुन त्याप्रमाणे पैशाची तरतूद करणे. (कलम ९.१)

♦ राष्ट्रीय विकास आराखडा विकसित करणे. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे, शिक्षण तज्ज्ञ व संबंधित व्यक्तींना सहभागी करून घेणे.(कलम ९.२)

♦ राज्य सरकारना आवश्यक ती तांत्रिक संसाधने पुरविणे.(कलम ९.३)

स्थानिक सरकारची जबाबदारी

♦ शालाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करुन शाळांची गरज ओळखणे व कळवणे. (कलम १२.१ (i))

♦ शिक्षक भरती व प्रशिक्षणासाठीचे नियोजन व तरतूदी करणे. (कलम ११.२ (v))

♦ एनसीईआरटीने सांगितल्याप्रमाणे नवा अभ्यासक्रम लागू करणे. (कलम ११.२ (vi))

♦ सरकारी, पूर्ण अनुदानित शाळांना इमारत, शैक्षणिक साहित्य इ. आवश्यक गोष्टींची पूर्तता करणे. (कलम ११.२ (viii))

♦ सर्व पातळ्यांवर माहिती साठा (डाटा) तयार करणे.

राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण आयोग

या संपूर्ण कायद्याच्या अंमलबजावणी नीट होते की नाही हे पाहण्यासाठी राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्याची सूचना या कायद्याने केली आहे. शिक्षण क्षेत्रातील एखाद्या नामवंत व्यक्तीची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याची सूचना पंतप्रधान, लोकसभेचे अध्यक्ष, विरोधी पक्षनेते आणि मानवसंसाधन मंत्री राष्ट्रपतींना करतील.(कलम ३२.३)

♦ केंद्र सरकार या कायद्याची अंमलबजावणी व देखरेखीसाठी प्राथमिक शिक्षणासाठीच्या राष्ट्रीय आयोगाची नेमणूक करेल. (कलम ३२.१)

♦ यामध्ये मुलांचे हक्क व विकास, वंचितांचा विकास, प्राथमिक शिक्षणातील तसेच अर्थ व कायदा अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ असतील. (कलम३२.२ (बी))

♦ हा आयोग गुणवत्तापूर्ण समान दर्जाचे शिक्षण मिळते की नाही याबरोबरच शाळा-शिक्षक-पालक यामधील तक्रारी निवारण्याचे काम देखील करेल. (कलम३२.४)

संवादाचे मुद्दे

विधेयकातील काही मुद्दयांवर चर्चा व्हावी व ज्या मुद्दयांचा अंतर्भाव असावा किंवा काही बदल व्हावेत असे वाटते ते पुढे देत आहोत.

१) विधेयकाला नेहमीच्या प्रथेप्रमाणे प्रस्तावना नसते ती येथे आहे ती ठेवावी. ज्यामध्ये सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षतेच्या व्यापक संदर्भात शिक्षणाचा विचार मांडला आहे. त्यामध्ये स्पष्टपणे एकात्मतेसाठी पुढील गोष्टीचा उल्लेख व्हावा.

वर्ग, जात, लिंगभाव आणि भाषेच्या बंधना पलिकडील सामाजिक एकात्मता जोपासणाऱ्या सामायिक शाळा व्यवस्थेतून ही मूल्ये स्पष्टपणे

समोर यावी.

२) ८६ व्या घटनादुरुस्ती प्रमाणे 'मूल' ची व्याख्या मुलगा/मुलगी अशा आहे. परंतु सुप्रीम कोर्टाचा निर्णय, संयुक्त राष्ट्रसंघ किंवा बाल गुन्हेगारी कायदा या सर्वांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे हा वयोगट ०-१८ असा आहे. याच व्याख्येचा आग्रह आपण धरावा. म्हणजे बालवाडी शिक्षण मिळेल व बाल संगोपन होईल.

३) विधेयकामध्ये मोफत शिक्षण जिथे म्हटले आहे त्यात वह्या-पुस्तके, युनिफॉर्म इत्यादीचा खर्च अंतर्भूत करावा व तसा स्पष्ट उल्लेख हवा कारण हा वरचा वाटणारा खर्च न परवडल्यामुळे कितीतरी मुले-मुली शिक्षण सोडतात.

४) याशिवाय एनडीए सरकार पेक्षा शिक्षण देण्याची सक्ती ही सरकारवर टाकली आहे.

५) विधेयकात खाजगी शाळांवर गरीब थरातील २५% मुलांना मोफत शिक्षणाच्या दिशेने प्रक्रियापुढे नेण्यासाठी हे बंधन ५०% पर्यत वाढवण्याची मागणी आपण धरावी.

६) दरवर्षी १७,००० कोटी रु. एवढा जादाचा खर्च सरकारला येणार आहे. हा बोजा एकट्या केंद्र सरकारने घ्यावा का राज्य सरकारवर काही जबाबदारी टाकावी?

७) खाजगी शाळांची सर्व अंगाने पाहणी करण्यासाठी सरकारने एक कमिटी नेमावी यासाठी CABE समिती ने मसुद्यात केलेली तरतूद मंत्रालयापर्यंत जाताना वगळण्यात आली आहे. ती टाकावी.

८) प्राथमिक स्तरावरील शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले जावे आणि पहिली पासून इंग्रजी भाषा नसावी.

९) 'शेड्यूल' मध्ये शाळा म्हणजे भौतिक रचना असा विचार केला आहे व अनौपचारिक केंद्रे, केंद्रे यांना पूर्ण वगळले आहे.

१०) विधेयकात प्राथमिक शिक्षणाच्या आयोगाबाबत म्हटलेले पुरेसे आहे काय? आणखी कुठले अधिकार/कार्ये या आयोगाकडे असावेत अस वाटतं?

११) विस्थापित मुलांसाठी, अपंग मुलांसाठी आणि कमकुवत घटकातील मुला/मुलींसाठी कोणत्या विशेष तरतुदी तुम्हाला आवश्यक वाटतात?

विधेयकामध्ये काही दुरुस्त्या/सुधारणा सुचवावयाच्या असतील तर खालील अधिकाऱ्याकडे आपण कळवू शकता -

श्री अमित कौशिक
संचालक, शिक्षण विभाग मानव संसाधन विकास मंत्रालय,
शास्त्री भवन, नवी दिल्ली - ११०००१
ईमेल: amit.edu@sb.nic.in

या मोहिमेत तसेच शिक्षणाच्या या प्रक्रियेत आपण काय योगदान करु शकता यासाठी भारत ज्ञान विज्ञान समुदायच्या राज्य कार्यालयाला कळवणे. आपल्या जिल्ह्यात/गावात यासाठी आग्रह धरणे.

संकलन: किशोर दरक / विनया देशपांडे

❑❑❑

धोरणात्मक सारांश

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (NCERT) कार्यकारी समितीने १४ व १९ जुलै २००४ ला झालेल्या तिच्या बैठकांमध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. पुनर्रचनेसंबंधी आदरणीय मंत्रिमहोदय, मानव संसाधन विकास मंत्रालय, यांनी लोकसभेमध्ये केलेल्या वक्तव्यानुसार हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर शिक्षण सचीव, मानव संसाधन विकास मंत्रालय, यांनी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांना १९९३ च्या 'ओझ्याविना शिकणे' (Learning without Burden) या अहवालानुसार 'शालेय शिक्षणासाठीच्या शैक्षणिक अभ्यासक्रम आराखड्या'च्या (NCFSE २०००) पुनर्विलोकनाची गरज कळवली होती. या निर्णयाच्या संदर्भात प्रा.यशपाल यांच्या नेतृत्वाखाली एक राष्ट्रीय सुकाणू समितीची आणि २१ राष्ट्रीय 'स्रोत' गटांची (फोकस ग्रुप) स्थापना करण्यात आली. प्रगत अध्ययन संस्था, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा कर्मचारी वर्ग, शालेय शिक्षक आणि स्वयंसेवी संस्था हे या समित्यांचे सदस्य होते. देशाच्या सर्व भागांमध्ये संबंधितांशी विचार विनिमय केला गेला. याशिवाय म्हैसूर, अजमेर, भोपाळ, भुवनेश्वर आणि शिलाँग येथील राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या क्षेत्रीय शैक्षणिक संस्थांमध्ये ५ मोठी चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. राज्यांचे सचीव, राज्यांच्या शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा, परीक्षा मंडळे यांच्याशी देखील सल्लामसलत केली गेली. ग्रामीण शिक्षकांचा सल्ला घेण्यासाठी त्यांची एक राष्ट्रीय परिषद भरविण्यात आली. राष्ट्रीय व क्षेत्रीय वर्तमानपत्रांमधून सर्वसामान्य नागरिकांचे मत मागविण्यासाठी जाहिराती दिल्या गेल्या व त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला.

सुधारित राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या (NCF) मसुद्याची सुरुवात रवींद्रनाथ टागोरांच्या 'संस्कृती अन् प्रगती' या निबंधातील एका अवतरणाने होते. यात हे महाकवी आपल्याला स्मरण करून देतात की, 'सर्जक वृत्ती' आणि 'नि:स्वार्थीपणाचा निखळ आनंद' हे बालपणी कळीचे असतात. आणि हे दोन्हीही अविचारी प्रौढ जगामुळे विकृत होऊ शकतात. पहिल्या प्रकरणात स्वातंत्र्यापासून आजतागायत अभ्यासक्रमातील सुधारणांसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांची चर्चा केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (१९८६) शिक्षणाची

राष्ट्रीय व्यवस्था विकसित करण्याचे माध्यम म्हणून ही कल्पना पुढे ठेवली होती आणि त्याचा गाभा हा देशाच्या राज्यघटनेने शिरोधार्य मानलेल्या राष्ट्रीय विकासाच्या दृष्टिकोनावर आधारित असेल हे स्पष्ट केले होते. १९९२ च्या 'कृतिकार्यक्रमाने' हाच दृष्टिकोन सविस्तर स्पष्ट करताना त्यात लवचिकता, गुणवत्ता अन् समर्पकता यावर भर दिलेला आहे.

सामाजिक न्याय, समानता या मूल्यांवर आधारित धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठित आणि बहुविध भारतीय समाजाच्या संविधानात्मक दृष्टीपासून मार्गदर्शन घेऊन या दस्तावेजात शिक्षणाची काही व्यापक ध्येये समोर ठेवण्यात आली आहेत. यात कृती व विचारांचे स्वातंत्र्य, इतरांच्या भावना व स्वास्थ्य या विषयीची संवेदनशीलता, नव्या परिस्थितीला लवचिक व सर्जकपणे प्रतिसाद देण्यास शिकणे, लोकशाही प्रक्रियांमध्ये सहभागी होण्याची मनोभूमिका असणे आणि आर्थिक प्रक्रिया व सामाजिक बदल यामध्ये कार्य करण्याची व योगदान देण्याची कुवत यांचा त्यात समावेश आहे. आपल्या लोकशाही जीवनपद्धतीच्या सक्षमीकरणाचे माध्यम म्हणून अध्यापनाने कार्यरत राहायचे असेल, तर त्याने पहिल्या पिढीतील शिकणाऱ्यांच्या अस्तित्वाला योग्य प्रतिसाद दिला पाहिजे. प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुला/मुलीचा मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देणाऱ्या घटनादुरुस्तीने अशा शिकणाऱ्यांचे शालेय व्यवस्थेत टिकून राहणे आता अनिवार्य केले आहे. शिकणाऱ्यांची जात, धर्म, लिंग वा अक्षमता भेदांपलिकडे जाऊन, सर्व मुलांना आरोग्य, पोषक आहार व समावेशक शालेय वातावरण यांची खात्री देऊन शिक्षणामध्ये सक्षम करा, असा आदेश या घटनादुरुस्तीने आपल्याला दिला आहे. शिकणे हे मुलांवरील बोजा व ताणाचा स्रोत बनले आहे हे शिक्षणाची ध्येये आणि गुणवत्ता यात गंभीर विकृती निर्माण झाल्याचेच द्योतक आहे. या विकृती दुरुस्त करण्यासाठी प्रस्तुत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी पाच मार्गदर्शक तत्त्वे समोर ठेवत आहे : १. ज्ञानाचे नाते शाळेबाहेरील जीवनाशी जोडणे, २. शिकणे हे घोकंपट्टी पद्धतीपासून फारकत घेईल याची खात्री करणे, ३. अभ्यासक्रम असा समृद्ध करणे की, ज्यामुळे तो पाठ्यपुस्तकांच्या मर्यादेपलीकडे जाईल, आणि ४. परीक्षा जास्त लवचिक करणे व त्या वर्गातील नित्य जीवनाचा एक भाग बनविणे, ५. देशाच्या लोकशाही चौकटीअंतर्गत संवेदनक्षम व्यक्तिमत्वाची घडण करणे.

प्राथमिक वर्गातील आपले अध्यापनशास्त्रीय प्रयत्न हे मुलामुलींचे बाल्यावस्थेत केले जाणारे संगोपन, तसेच शिक्षणाचा लक्षणीय विस्तार व त्याचे व्यावसायिक नियोजन होणे, यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. प्राथमिक शाळेच्या पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकांची पुनर्रचना ही आरंभिक बाल

संगोपन व शिक्षणा (आ.बा.सं.शि. - Early Childhood Care & Education/ ECCE) च्या सुपरिचित तत्त्वांनुसार करण्याची गरज आहे. ज्ञानाचे स्वरूप व शिकण्यासाठी मुले कोणत्या पद्धती वापरतात याची चर्चा दुसऱ्या प्रकरणात केलेली आहे आणि त्यामध्ये जो सैद्धांतिक पाया मांडला आहे त्याआधारे अभ्यासक्रमाच्या विविध क्षेत्रांबाबतच्या शिफारसी तिसऱ्या प्रकरणात केल्या आहेत. मूल हे ज्ञानाची रचना करते हे लक्षात घेता अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तके यांनी शिक्षकाला मुलाचा स्वभाव व वातावरण यांच्याशी सुसंगत अशा वर्गातील अनुभवांचे संघटन करण्यास मदत केली पाहिजे आणि सर्व मुलांना तशा संधी पुरविल्या पाहिजेत. मुलांची शिकण्याची नैसर्गिक इच्छा व पद्धती यांचा विकास करणे हेच शिकण्याचे ध्येय असले पाहिजे. ज्ञान हे माहितीपेक्षा वेगळे आहे हा फरक लक्षात घेण्याची गरज आहे आणि शिकविणे म्हणजे तथ्यवजा गोष्टी लक्षात ठेवणे किंवा त्यांच्या प्रसारणाचे प्रशिक्षण नव्हे, तर ती एक व्यावसायिक कृती म्हणून पाहण्याची गरज आहे. कृती हेच जगाचा अर्थ लावण्याच्या मुलाच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी असते आणि म्हणूनच प्रत्येक संसाधन हे मुलांना अभिव्यक्तीसाठी, वस्तू हाताळण्यासाठी, त्यांच्या सामाजिक व नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेण्यासाठी व आरोग्यपूर्ण वाढीसाठी सहाय्यकारी ठरेल अशा रीतीने उपयोगात आणले पाहिजे. मूल स्वत: ज्ञानाची रचना करू शकेल अशाप्रकारे मुलांच्या वर्गातील अनुभवांचे संघटन करायचे असेल तर आपल्या शालेय संरचनेत भरीव व्यवस्थात्मक सुधारणांची गरज आहे (प्रकरण ५). अभ्यासक्रमाची क्षेत्रे वा शालेय विषयांच्या पुनर्संकल्पनात्मक मांडणीची गरज आहे (प्रकरण ३) आणि शालेय संस्कृतीची गुणवत्ता सुधारण्यासाठी संसाधनांची गरज आहे (प्रकरण ४).

शालेय अभ्यासक्रमातील चारही परिचित क्षेत्रे म्हणजे भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक शास्त्रे, यात लक्षणीय बदल सुचविण्यात आलेले आहेत. यामुळे शिक्षण आजच्या तसेच भावी गरजांशी जास्त अर्थपूर्णपणे जोडले जाईल व आज मुले ज्या ताणाचा सामना करीत आहेत तो ताण हलका होईल. हा राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा विषयांतील भेदरेषा पुसट करण्याचा शिफारस करतो, त्यामुळे मुलांना एकात्मिक ज्ञानाचा आस्वाद घेता येईल आणि आकलनाचा आनंद मिळविता येईल. याशिवाय स्थानिक ज्ञान व पारंपरिक कौशल्यांच्या समावेशासह बनलेली पाठ्यपुस्तके व इतर साहित्याची बहुविधता, आणि मुला/लीच्या घरच्या तसेच समुदायाच्या (कम्युनिटी) वातावरणाशी अनुरूप अशी शाळेतील रसरशीत जिवंत वातावरणाची गरजही सुचविण्यात आली आहे. भाषाभ्यासात त्रिभाषासूत्र लागू करण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावेत असे सुचविले आहे आणि त्याबरोबरच मुलांची मातृभाषा - ज्यात आदिवासी

बोलीभाषा देखील धरल्या आहेत - शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम म्हणून मान्यता देण्यावर भर दिला आहे. भारतीय समाजाचे बहुभाषिक स्वरूप हेच प्रत्येक मुलात बहुभाषिक नैपुण्य रुजविण्याचा स्रोत आहे. त्यामध्ये इंग्रजीतील नैपुण्याचादेखील समावेश आहे. शिकणे हे जर मातृभाषेतील सुदृढ भाषाशिक्षणावर आधारित असेल तरच हे शक्य आहे. वाचन व लेखन, ऐकणे व बोलणे यामुळे मुलाला अभ्यासक्रमाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती करण्यास मदत होते व म्हणूनच ते अभ्यासक्रमाच्या नियोजनाचा पाया असले पाहिजेत. शालेय शिक्षणासाठी प्रत्येक मुला/लीला भक्कम पाया मिळवून द्यायचा असेल तर सर्व प्राथमिक वर्गांमध्ये वाचनावर भर देणे आवश्यक आहे.

गणिताच्या अध्यापनामुळे मुला/लीच्या विचार व तर्क करण्याच्या, अमूर्त गोष्टी पाहण्याच्या व हाताळण्याच्या, प्रश्नांची सूत्रात मांडणी व त्यांचे निरसन करणे यासाठीच्या, साधनांमध्ये वाढ झाली पाहिजे. ध्येयांचा हा व्यापक पट आवाक्यात आणण्यासाठी मुलीला/मुलाला तिच्या/त्याच्या अनुभवात रुजलेले समर्पक व महत्त्वाचे असे गणित शिकवले पाहिजे. गणितात यशस्वी होणे हा प्रत्येक मुला/लीचा अधिकार आहे, असे त्याकडे पाहिले पाहिजे. यासाठी गणिताची व्याप्ती विस्तारणे आणि त्याचा इतर विषयांशी संबंध जोडणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेला संगणकसंच-साहित्य, सूचनावली, संपर्क सुविधा पुरविण्याच्या आव्हानाचा पाठपुरावा केला पाहिजे.

विज्ञान अध्यापनाची पुनर्बांधणी अशा प्रकारे केली पाहिजे की, मुला/मुलींना त्यांच्या दैनंदिन अनुभवांचे परीक्षण व विश्लेषण करता येईल. पर्यावरणाशी संबंधीत प्रश्न/मुद्दे आणि त्याविषयी जाणीव प्रत्येक विषयात आणि वर्गाबाहेरील प्रकल्पकार्यासह विविध उपक्रमांमध्ये असेल यावर भर

दिला पाहिजे. अशा प्रकल्पांमधून येणारी माहिती आणि समज यामुळे भारताच्या पर्यावरणाविषयी सार्वत्रिकरित्या उपलब्ध असणाऱ्या, पारदर्शी माहितीच्या साठ्याचा विस्तार होण्यास मदत होईल, जे की एक मौल्यवान शैक्षणिक संसाधन बनू शकेल. व्यवस्थित नियोजन केल्यास या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांपैकी अनेक प्रकल्प ज्ञाननिर्मितीच्या दिशेने वाटचाल करू शकतील. संपूर्ण देशभर व हळूहळू दक्षिण आशियातही 'शोधातून शिकण्या'चा प्रसार करण्यासाठी बालविज्ञान अधिवेशनांच्या धर्तीवर एक सामाजिक चळवळ उभारण्याची दृष्टी ठेवली पाहिजे.

राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्यामध्ये सुचविल्याप्रमाणे सामाजिक शास्त्रांमध्ये विद्याशाखीय सीमारेषांना मान्यता देत असतानाच महत्त्वाच्या विषयांबाबत उदा. पाणी, आंतरविद्याशाखीय एकत्रिकरणावर भर देण्यात आला आहे. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास वंचित गटांच्या परिप्रेक्ष्यातून करण्याच्या दृष्टीने वैचारिक चौकटीत बदल करण्याची आम्ही शिफारस करतो आहोत. लिंगभावात्मक न्याय, दलित व आदिवासी प्रश्न आणि अल्पसंख्यकांच्या जाणिवांसंबंधी संवेदनशीलता हे सामाजिक शास्त्रांच्या सर्व क्षेत्रांत समाविष्ट केले पाहिजे. नागरिकशास्त्राची राज्यशास्त्र म्हणून पुनर्बांधणी केली पाहिजे. तसेच, मुला/लींच्या भूतकाळासंबंधीच्या संकल्पना व नागर अस्मिता यांना प्रभावीपणे आकार देणारा म्हणून इतिहासाचे महत्त्व ओळखले पाहिजे.

हा आराखडा अभ्यासक्रमातील इतर चार क्षेत्रांकडे लक्ष वेधतो - काम, कला व पारंपरिक हस्तकला, आरोग्य व शारीरिक शिक्षण आणि शांतता. कामाच्या संदर्भात, प्राथमिक स्तरापासून पुढे काम हे शिक्षणाशी जोडण्याच्या दृष्टीने काही मूलगामी उपाय सुचविले आहेत. यामागील भूमिका अशी आहे की, काम हे ज्ञानाचे अनुभवात रूपांतर करते व आत्मनिर्भरता, सर्जकता व सहकार्य यासारखी महत्त्वपूर्ण वैयक्तिक व सामाजिक मूल्ये निर्माण करते. वरच्या वर्गांसाठी कामासंबंधी शाळाबाह्य संसाधने वापरणे हे अधिकृतपणे मान्य करण्याचे धोरण असावे, अशी शिफारस करण्यात आलेली आहे. यामुळे ज्या विद्यार्थ्यांना उपजीविकेसंबंधी शिक्षण घ्यायचे आहे त्यांचा फायदा होईल. अशा शाळाबाह्य संस्थांना अधिकृत मान्यता दिल्यास त्या मुलांना अवजारे व इतर साहित्यानिशी काम करण्यास 'श्रम-मंच' पुरवू शकतात. हस्तकलांचे नकाशा-आरेखन करून अशी क्षेत्रे अधोरेखित करावीत की, जिथे मुलांना स्थानिक सहभागाने विविध हस्तकला प्रकारांचे व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून देता येईल.

एक विषय म्हणून कलेची, सर्व स्तरांवर शिफारस करण्यात आलेली आहे, व त्यात संगीत, नृत्य, दृक्कला व नाट्य/रंगभूमी या चार मुख्य क्षेत्रांचा

समावेश असावा. त्यात निव्वळ निर्देशनवजा अध्यापनावर नव्हे तर आंतरक्रियात्मक पद्धतींवर भर द्यावा. कारण कलाशिक्षणाचे ध्येयच हे आहे की, सौंदर्यदृष्टी, वैयक्तिक जाणीव व विविध कलामाध्यमांद्वारे स्वत:ला व्यक्त करण्याची क्षमता यांचा विकास व्हावा. भारताच्या पारंपरिक हस्तकलांचे सौंदर्यमूल्य व आर्थिक मूल्य हे दोन्ही शालेय शिक्षणात समर्पक व अर्थपूर्ण आहे हे ओळखले पाहिजे.

मुलांचे शाळेतील यश हे पोषक आहार व सुनियोजित शारीरिक शिक्षणाचे उपक्रम यावर अवलंबून असते, म्हणूनच दुपारच्या आहाराचा (खिचडी) कार्यक्रम बळकट करण्यासाठी साधनसामग्री व शाळेचा वेळ हे उपलब्ध केले गेले पाहिजे. शाळापूर्व स्तरांपासूनच पुढे सर्व स्तरांवर आरोग्य व शारीरिक शिक्षण कार्यक्रमांमध्ये मुलांइतकेच मुलींकडे लक्ष दिले जात आहे की नाही याची खातरजमा करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे.

तंटे व संघर्षाचे निराकरण करण्याचा मार्ग म्हणून जगभर हिंसा व असहिष्णुता यांचा वापर वाढत आहे. म्हणूनच या ठिकाणी राष्ट्रीय विकासासाठीची पूर्वअट व एक सामाजिक मनोभाव म्हणून शांततेचा पुरस्कार केलेला आहे. कारण एक व्यापक मूल्यांची चौकट म्हणून आजच्या जगात शांतता ही अतिशय समयोचित आहे. एका लोकशाहीनिष्ठ व न्यायपूर्ण संस्कृतीमध्ये मुलां/लींचे सामाजिकरण करण्याची शांतता-शिक्षणाची क्षमता प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सर्व विषयांमध्ये व सर्व स्तरांवर सुयोग्य उपक्रम व विषयघटक यांची चाणाक्षपणे निवड करता येईल. 'शांतता शिक्षणा'चा एक अभ्यासक्षेत्र म्हणून शिक्षकांच्या अभ्यासक्रमात समावेश करावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

शालेय वातावरण हा एक अभ्यासक्रमाचा पैलू म्हणून त्याची चर्चा केलेली आहे, कारण त्यातूनच शिक्षणाची ध्येये व शाळेतील यशासाठी लागणाऱ्या शिकण्याच्या पद्धती आत्मसात करण्यासाठी लागणारी मनोभूमिका मुला-मुलींमध्ये तयार होत असते. शाळेच्या वेळेचे एक संसाधन म्हणून लवचिकपणे नियोजन करण्याची गरज आहे. म्हणूनच ज्यांचे नियोजन स्थानिक पातळीवर केले जाईल अशा लवचिक शालेय दिनदर्शिका व वेळापत्रके यांची शिफारस केली आहे. यात प्रकल्पकार्य व नैसर्गिक तसेच ऐतिहासिक वारसास्थळांना भेटसहली अशा विविध प्रकारच्या उपक्रमांसाठी लागणाऱ्या कमीअधिक कालावधींच्या तासिकांची सोय असावी. मुलां/लींसाठी अधिक शिकण्यासाठीची साधने, विशेषत: प्रादेशिक भाषेतील पुस्तके व संदर्भसाहित्य – ज्यांचा वापर शाळा व शिक्षक संदर्भ ग्रंथालयेही करतील – असे निर्माण करण्यासाठीच्या विशेष प्रयत्नांची गरज आहे. यात ज्ञानप्रसारणात्मक तंत्रज्ञानांवर भर देण्याऐवजी आंतरक्रियात्मक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे. उच्च माध्यमिक स्तरावर हा आराखडा बहुविध व गतिमान पर्यायांच्या महत्त्वावर भर देतो. यामुळे मुलांना साचेबद्ध शाखांमध्ये घट्ट बसवण्याच्या व त्यांच्या, विशेषत: ग्रामीण भागातील मुलांच्या, संधींचा संकोच करणाऱ्या रुढीबद्ध प्रवृत्तीला छेद देता येईल.

व्यवस्थात्मक सुधारणांच्या संदर्भात शिक्षणातील गुणवत्ता व जबाबदारीची भावना सुधारण्यासाठी, समुदायांच्या सहभागाला प्रोत्साहन देणाऱ्या एका सुसूत्र पद्धतीच्या आधारे, हा दस्तावेज पंचायत राजसंस्था बळकट करण्यावर भर देतो. पंचायती राज संस्थांना त्यांच्या स्थानिक पर्यावरणीय संसाधनांचे चांगल्या प द्धतीने व्यवस्थापन व पुनरुज्जीवन करण्यास माहितीचा पाया रचण्यामध्ये शाळांमधील पर्यावरणाशी संबंधीत अनेकविध प्रकल्पांचा उपयोग होऊ शकतो. गुणवत्ता सुधारण्यासाठी, शालेय स्तरावर शैक्षणिक नियोजन व नेतृत्वाची गरज आहे व त्यामध्ये गट (तालुका) व केंद्र (समूह) पातळीवरील भूमिकांमध्ये असलेले व्यूहरचनात्मक फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. १९८४ च्या चट्टोपाध्याय समितीच्या शिफारसींनुसार अलीकडच्या काळात शिक्षक प्रशिक्षणात व्यावसायिक निकष पातळ केले जात आहेत, पण हा कल पालटवण्यासाठी शिक्षकांचे शिक्षण व प्रशिक्षण यात मूलगामी उपाय योजण्याची गरज आहे. सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अधिक सर्वसमावेशक व दीर्घ असायला हवे आहेत. यात मुलांचे निरीक्षण करण्याच्या व अध्यापनशास्त्रीय सिद्धांतांची सांगड व्यवहाराशी घालण्याच्या पुरेशा संधी शाळेत प्रशिक्षणार्थी म्हणून काम करण्याच्या काळात उपलब्ध झाल्या पाहिजेत.

परीक्षापद्धतीतील सुधारणा हे अभ्यासक्रम नूतनीकरणाच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे आणि ते विशेषत: १० व १२ वीतील मुले/मुली



व त्यांचे पालक यांना जाणवणाऱ्या वाढत्या मानसिक तणावांवर उपाय करण्याच्या दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे. यासाठीच्या नेमक्या उपायांतील एक म्हणजे प्रश्नपत्रिकांचे स्वरूप अशा प्रकारे बदलणे की, ज्यामुळे निव्वळ स्मरणशक्ती व पाठांतर हा मूल्यांकनाचा आधार असणार नाही तर त्याजागी तर्कक्षमता व सर्जनक्षमता हे मूल्यांकनाचा आधार असतील. दुसरे असे की, पारदर्शकता व शिकण्याच्या प्रक्रियेअंतर्गतच मूल्यमापनास प्रोत्साहन देत परीक्षांना वर्गातल्या जीवनाशी एकरूप करणे. बोर्डपूर्व परीक्षांवर आज जो भर आहे तोही उलटवला पाहिजे. यश व कर्तृत्व यांचे विविध स्तर गाठण्याचे अनेक पर्याय मुलांना खुले असतील असा धोरणव्यूह स्वीकारला पाहिजे. यातूनच सध्याच्या 'उत्तीर्ण' व 'अनुत्तीर्ण' या दोन्हींमध्येच असलेल्या मोघम वर्गीकरणाच्या पद्धतीवर मात करता येईल.

शेवटी हा दस्तावेज शालेय व्यवस्था व इतर नागरी समाजगट – ज्यात बिगर सरकारी संस्था व शिक्षक संघटनांचा समावेश आहे – यांच्यात भागीदारी असावी अशी शिफारस करतो. आज जे नावीन्यपूर्ण अनुभव उपलब्ध आहेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य धारेत समाविष्ट केले पाहिजे आणि प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात अंतर्भूत असलेली आव्हाने हा राज्यसंस्था व मुलांशी संबंधित सर्व संस्था यांच्यामधील व्यापक सहकार्याचा विषय बनला पाहिजे.

अनुवाद:डॉ. उदय नारकर

❑❑❑

आदरणीय गुरुजी,

स.न.

मला खात्री आहे- तुम्हाला माझं नांवसुध्दा आठवणार नाही, कारण तुम्ही मला शिक्षणाच्या वाटेवर मधेच सोडून दिलं होतंत. माझ्यासारख्या काही माझ्या मित्रांना देखील. तुमच्या व्यवसायातील ही अगदी साधी घटना असणार. पण तुम्हाला माहिती पाहिजे की तुमच्या या कृत्यांने आम्हाला आयुष्याच्या धगधगत्या वास्तवाच्या तोंडी दिलंत- शेतावर राबण्यासारख्या किंवा कारखान्यांची धुरांडी स्वच्छ करण्यासारख्या कष्टमय कामाला सुरुदात झाली. आमचं रक्षण करणारा कुणी वाली नव्हता.

शाळेमध्ये कित्येकदा तुम्ही याला कारखान्यात पाठवा, हा काय डोंबल्याचा अभ्यास करणार, म्हणालात. पण माझ्या निरक्षर वडिलांनी मला बार्बियानाला पाठवलं.

तुम्हाला बार्बियाना माहिताये का? ती काही शाळा अथवा एखादं शहर नाही. वीसेक शेतांचा गठ्ठा म्हणजे इटलीतला बार्बियाना. एका धर्मगुरुने आमच्यासारख्या शालाबाह्य मुलांसाठी बार्बियानाची स्थापना केली. शेतक-यांची ती शाळा नाही तर जीवनाभिमुख, श्रमप्रतिष्ठा मानणारी शाळा-शिक्षणाचं केंद्र आहे ते! काम आणि शिक्षणाची सांगड घालणारं.

बार्बियानामध्ये आम्हीच शिक्षक होतो. मोठया मुलांनी लहानांना शिकवायचं. आम्हाला आनंद व्हायचा, शिकता शिकविताना, आणि शेतीकामाच्या कष्टांचा विसर पडायचा.

माझ्या अनुभवावरुन चांगले विदयार्थी बसविलेल्या वर्गाला शिकवायला शिक्षक नेहमीच खुश असतात. पालकांनाही तसलेच वर्ग हवे असतात. परिणामी समाजातही तसेच वर्ग बनतात. आमच्या हया सहका-यांबरोबर मिसळायची आम्हाला कधीच संधी मिळत नाही. समाजातला भेदाभेद तिथून सुरु होतो.

आमच्या निरक्षर आईवडिलांना असल्या गोष्टी कळत नाहीत. त्यांना वाटतं, त्यांचीच मुलं शिकण्याच्या लायकीची नाहीत. माझे बाबा म्हणाले शिक्षक चांगलेत. शाळाही चांगलीये. पण दुर्दैवानं देवानंच मला हुशार पोरगं दिल नाही म्हणून त्यानं मातीत राबावं असं मी ठरवलं.

घटनेनं आम्हाला जे मुलभूत हक्क दिलेत त्यात आठ वर्षाचं सक्तीचं शिक्षण दिलयं पण आम्ही पुन्हा पुन्हा त्याच त्या वर्गात नापास होत राहिलो.

जमीनदाराचा मुलगा पेरे सगळ्या परीक्षांमध्ये पास होतो. त्याला त्याच्या काकांनी शाळेची पुस्तकं भेट दिली. मला विळा भेट म्हणून मिळाला. पुस्तंकाशिवाय मी परीक्षा कशी पास होणार?

भाजीच्या दुकानातून भाजी विकणारा तो मुलगा पाहिलात? तुम्ही पाठवलतं त्याला तिथं, जर तुम्ही त्याला म्हंटल असतं - का रे येत नाहीस शाळेत? मी पास करीन तुला. तुझ्याशिवाय वर्गात तेवढी मजा येत नाही. मला वाटतं तुमचं उत्तर असं असेल - मला काही सगळ्या विदयार्थ्यांची आर्थिक स्थिती माहिती नाही. ज्याला अभ्यास करता येणार नाही तो नापास होणार . पण लक्षात ठेवा, हा अन्याय आहे. कारण आम्ही सर्वजण एकसारखे नाहीत. आमचे जीवनानुभव, शिकण्याच्या वेळा , आर्थिक स्थिती इ. पूर्णतः वेगळे आहेत.आम्हाला उच्चवर्णीय मुलांसारखे मुददे कसे शिकता येतील? प्रिय गुरुजी, आपल्या राज्यकर्त्यांच्या चुकीच्या निर्णयाविरुध्द भांडायला तुम्ही आमचं नेतृत्व केलं पाहिजे. १८० कामाच्या

दिवसासाठी १८५ सुट्टया ठेवतात ते. तुम्ही अतिशय आनंदाने ते राबवता. एवढच नाही तर तुम्ही हस-या चेह-यानं शैक्षणिक अधिका-यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या सुटटयां वर्गात जाहीर करता. सुटटयांच स्वागत आणि कामाचा भार वाटणं । मग आम्हाला शाळा कशी आवडेल ?

अभ्यासक्रम केवळ चांगल्या विधार्थ्यासांठी आहे. आमच्या सारख्यासाठी नाही. शिकण्याची वेळ आणि दिवसांची संख्या देखील, आमच्या मागासलेपणाची पाठयपुस्तक आणि अभ्यासक्रम हे एक कारण आहे. काय खर नां?

कधी तुम्ही शिक्षण व्यवस्थेला, शैक्षणिक अधिका-यांना दोष दयायचात. आम्ही विचारतोय, अधिका-यानां योग्य मार्ग दाखवायचा कुणी? आमचे आईबाप आहेत निरक्षर. ते करु शकतील ?

बार्बीयानाच्या शाळेत मला परीक्षेविषयी नीट समजलं. चांगले विदयार्थी सहज परीक्षेला बसतात, उत्तम मार्कांनी पास होतात. पण पुस्तकाबाहेरचा एक प्रश्न येऊ दयात त्यांची दांडी उडते. त्यांना गाणी येतात ती तुम्ही पाठ करायला सांगितलेली. समाजात उच्च स्थानी पोहचायला ते परीक्षेची शिडी वापरतात. तुम्ही १०-१५ चांगले पेपर तपासता आणि आमच्यासारख्या मागासलेल्यांना नावे ठेवता. पण तुमच्याशिवाय आम्हाला मदत करणार तरी कोण?

गेल्या ५० वर्षाच्या काळात म्हणजे माझ्या वडिलांच्या आणि आजोबांच्या काळात डोकावून पहा, प्रशिक्षणाशिवाय तुमच्या शाळेतले किती विदयार्थी सदयस्थितीबददल बोलू शकतील?

तुम्ही अभ्यासू जाणकार आहात. आमच्याशी निगडीत कोणते सामाजिक विषय आहेत त्यांचा तुम्ही अभ्यास केलाय? वर्गात पुढच्या बाकावर बसलेल्यांकडे तुम्ही लक्ष देता. त्यांच्या क्षमतेनुसार शिकविण्याचा वेग ठरवता. स्वतःच्या कल्पना समोर मांडता, तुम्ही केवळ पाठयपुस्तकाचे अनुयायी आहात. अशी पाठयपुस्तकं आणि संस्कृती जी तुमच्यासारख्या लोकांनी तयार केली.

आमचा प्रश्न असा आहे की एका विशिष्ट गटासाठी शाळा काढणारे अधिकारी कोण? तुमच्यामागचा बोलविता धनी कोण? पेरेच्या आईने त्याला नीट मार्गदशन केलं. माझी आई त्यांच्याकडे धुणीभांडी करते. मला खात्री आहे , पेरे त्याच्या स्वतःच्या आयुष्यात त्याच घटनेची पुनरावृत्ती करणार. पिढयांनपिढया तेच चालणार ? या असमानतेपासून आमची सुटका कोण करणार? मला वाटतं तुम्ही काही विशिष्ट जणांना घेवूनच धावत सुटलात. पण आम्ही विनंती करतो की जरा तुमच्या मनाला आधी विचारा शाळा म्हणजे काय? शाळा म्हणजे आम्ही - आमच्यासारख्या शाळा.

तुम्ही पूर्ण वेळ शिकवायला हवं. कुणीही नापास होऊ नये अशी इच्छा बाळगायला हवी. आम्हाला तुमचं पूर्ण लक्ष हवं आहे. नाहीतर नापासगाडगी म्हणून आमची रवानगी पुन्हा घरी केली जाईल. अगदी झोपेतही आमचा विचार करा.

प्रिय गरुजी, तुम्हाला हवं ते सहकार्य करायला आम्ही तयार आहोत. आम्हांला अशा राबणा-या शिक्षकांचा अभिमान वाटतो. आमची चौकशी करणा-या, काळजी घेणा-या शिक्षकांचा.

मला वाटतं एक तरी शिक्षक असं लिहेल - इतर शिक्षकांसारख्या अजिबात नाही. मी, आम्ही वाट पाहतोय.

धन्यवाद!

(इटलीमधल्या एका मुलाने टस्कनीहून आपल्या शाळेतल्या शिक्षकांना लिहिलेले पत्र)

भावानुवादः प्रा. माधुरी दीक्षित



सुधी आणि राधी

राधी जाते का शाळेला?
ती बकऱ्या नेते चरायला
लाकुडफाटा कर गोळा
थकून येते घराला
भात टाकी शिजायला
मदत तिंचीच मायेला

सुधी जाते का शाळेला?
पुस्तकभारा ओझ्याला
थकून येते घराला
घरचा अभ्यास हा थोरला
आईबाबा द्या करुन
अभ्यास माझा उद्याला

राधीच्या माथी बोजा
सुधीच्या माथी बोजा
राधी म्हणते, पोटाला
लाकुडफाटा ये कामा
सांगा - पोटासाठी का
पुस्तक येइल कामाला?

राधी करते घरचे काम
बकऱ्या चार - लाकडं आण
माय शिकवते घरचे काम
नाव याचे नाही ज्ञान?
जे घरकाम राधी करते
पाउल त्यात तिचे फसते

सुधी जाते शाळेला
पोपटपंची...पासाला
शिकली काय वर्षाला?
कळत नाही तिचे तिला
सुधी अभ्यास जो करते
तेच कसे मग ज्ञान असे?

नको असे ! - नको असे !
मग हवे कसे? - हवे कसे?
घरकामाचे धडें हवे
पुस्तकामधी सुधीच्या
हवी पुस्तके सुधीची
हातामधी अन् राधीच्या.

डोळ्यात पाणी न येता शिकणं – एक स्वप्न ?
मुलांना कंटाळा येणार नाही असं शिकवणं – एक कल्पनाविलास ? '
शिक्षक विद्यार्थ्यांचा मित्र – अशक्य ?
जत्रेसारखी शाळा – एक स्वप्नरंजन ?

यागोष्टी अशक्य अजिबात नाहीत, ही स्वप्ने देखील नाहीत
हे सारे प्रत्यक्षात येऊ शकते!
मात्र त्यासाठी हवा तुमचा सहभाग
त्यासाठी
ज्ञान–विज्ञानाच्या चळवळीत सामील व्हा.
शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी व्हा : कलाकार, वैज्ञानिक, शिक्षक
किंवा स्वयंसेवक कोणत्याही रुपात.
मुलं–मुली तुमची वाट पाहताहेत.
पत्ता व फोन याच पुस्तिकेत शोधा, आजच संपर्क साधा